म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. ना.
दा. क्र. ११३८७


सन : १९६५

११३८७

IRBK-0111387
IRBK-0111387

म. ग्रं. ग दणी
तुग
वा नं

# आपलें घर



११३८७

# आपलें घर

म. ग्रं. [illegible]
क्र. ११३८७
[illegible]

लेखक

जयवन्त बाबुराव जगताप,
बी. ए. ( ऑनर्स ). बी. टी.
व्हाईस प्रिन्सीपॉल, गांधी ट्रेनिंग कॉलेज, पुणें.

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें शहर

किंमत १० आणे

IRBK-0111387

चित्रकार

वाय. ए. कदम, पुणें.

रघुवीर मुळगांवकर, मुंबई.

प्रकाशक

जयवन्त बाबुराव जगताप,

संचालक, जगताप पब्लिशिंग हाऊस

१२४८ शुक्रवार पेठ पुणें २

मुद्रक

शंकर त्र्यंबक आवटे

इंदिरा प्रेस, २७० सदाशिव पेठ, पुणें २.

११३५२

# अनुक्रमणिका


१. घर
पशुपक्ष्यांचीं घरें–आसरा–गुहा–झाडावरील घर–झोपडीचा जन्म (पृष्ठें १ ते ९)

२. घराचा जन्म
इतिहास–भूगोल–विविध नमुने–बांधणी–शिल्पशास्त्र— (पृष्ठें ९ ते १३)

३. आशिया
हिंदुस्थान–ब्रह्मदेश–चीन–जपान–मलाया–तुर्कस्थान–तिबेट–पर्शिया–पॅलेस्टाईन (पृष्ठें १४ ते २९)

४. आफ्रिका (पृष्ठें २९-३०)

५. युरोप
जर्मनी–स्वित्झरलंड–नेपल्स–स्लाव्हाकिया–ग्रीस–इंग्लंड–नॉर्वे–हॉलंड–रशिया–लाप्लँड (पृष्ठें ३० ते ३९)

६. आस्ट्रेलिया (पृष्ठें ३९ ते ४१)

७. अमेरिका (पृष्ठें ४१ ते ४७)

८. उंचावरचीं घरें ४७

९. फिरस्त्यांचीं फिरतीं घरें (४८ ते ५३)

१० शहरांचा उदय (५३ ते ५६)

११. आणखी कांहीं नमुने (५६ ते ५९)

१२. माणसानें केलेली सुधारणा (५९ ते ६२)

# प्रास्ताविक


प्राथमिक शाळेच्या नवीन अभ्यासक्रमांत विद्यार्थांना आपल्या देशाबाहेरील लोकांची राहणी, त्यांचीं घरें, त्यांचा पोषाख इत्यादिबद्दल माहिती द्यावी असा उल्लेख आहे. त्यास अनुसरुन जगांतील विविध देशांतील विविध जमातींच्या घरांची माहिती आणि घराच्या बांधणीमध्यें पूर्वीपासून आज तागायत झालेला फरक अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत मांडण्याचा या पुस्तकांत मी प्रयत्न केला आहे. ठिकठिकाणीं घरांचीं चित्रें देऊन आकर्षकपणा वाढविला आहे. चित्रावरून घरांचीं कल्पनाही सहज येते. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं टाईपही मोठा वापरला आहे सदर पुस्तकांतील विषय नाविण्यपूर्ण असून अद्यापि अशा तऱ्हेनें या परिचित विषयावर लिहिलेलें असे हें पहिलेंच पुस्तक आहे. पुस्तकांतील मजकूर तयार करतांना अनेक मराठी व इंग्रजी पुस्तकांचा उपयोग करावा लागला. त्या सर्व लेखकांचा मी आभारी आहे. पुस्तकांतील चित्रें गांधी ट्रेनिंग कॉलेजांतील प्राध्यापक वाय. ए. कदम यांनीं काढून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझ्या आजपर्यन्तच्या पुस्तकांना बृहन्महाराष्ट्रांतील वाचकवर्गानें ज्याप्रमाणें आश्रय दिला त्याप्रमाणें त्याही पुस्तकास त्यांचेकडून आश्रय मिळेल अशी अपेक्षा आहे.

— ज. वा. जगताप

७७३५९

# आपलें घर



## घर :

घर ! आपलें घर ! !

केवढा अर्थ आहे या एका शब्दांत ! तो उच्चारतांच आपलीं सारीं प्रेमळ माणसें डोळ्यापुढें थयथय उभीं राहतात. त्यांची प्रेमाची वागणूक आठवून आपल्या भावना उचंबळून येतात. 'हीं माझीं माणसें,' 'हें माझें घर' असें त्यांच्याविषयीं अभिमानानें आपण म्हणतो.

जीवनांतील विविध संकटांना तोंड दिल्यावर आणि प्रतिकूल परिस्थितींशीं दोन हात खेळल्यावर, झालेल्या श्रमांचा परिहार करण्यासाठीं आणि भावी संकटांना नव्या उत्साहानें तोंड देण्यासाठीं फार पूर्वींपासून मनुष्याला घराची गरज भासत आली. आणि ती तशीच पुढेंही

भासत राहील. ही गरज भागविण्यासाठीं मोठा राजवाडाच पाहिजे आणि झोपडीनें ती भागणार नाहीं असें नाहीं. राजाला राजवाड्यांत सुख लाभतें तर गरीबाला झोपडींत तें मिळतें. ज्या ठिकाणीं अन्तःकरण आहे, जिथें प्रेम आहे. ती जागा म्हणजेच 'घर.'

पशूपक्ष्यांचीं घरें :

घराची गरज फक्त माणसांना आहे असें नाहीं. तर पशू व पक्षी यांनाही त्याची गरज आहे. गाई, बैल, म्हशी हीं जनावरें 'गोठ्यांत' राहतात. सिंह, वाघ, चित्ते, यासारखी क्रूर जनावरें 'गुहेंत' राहतात. पक्षी 'घरटीं' तयार करून त्यांत राहतात. कांहीं 'बिळांत' राहतात. तर कांहीं 'पाण्यांत' राहतात. मनुष्याच्या घरांत जसें, कौशल्य आढळतें तसेंच तें त्यांच्याही घरांत पहावयास सांपडतें. काटक्या, गवताच्या काड्या, कापूस, पिसें इत्यादि मिळेल त्या क्षुल्लक जिन्नसा वापरून पक्षी आपापलीं घरटीं किती तरी सुंदर करतात. माणसांचें आपल्या घरावर जसें प्रेम असतें तसेंच या मुक्या प्राण्यांचेंही आपल्या ओबडधोबड घरावर अतिशय प्रेम असते. सायंकाळीं रानांतून जनावरें घराच्या ओढीनें झपाझप पावलें उचलतात. दिवसभर इतस्ततः घिरट्या घालणारीं पांखरें अंधार पडतांच घरट्याकडे धांव घेतात.

आसरा :

पशूपक्ष्यांचीं घरें काय किंवा माणसांचीं घरें

काय ती आसऱ्यासाठीं बांधलीं जातात. ज्या ठिकाणीं आसरा मिळतो त्यालाच आपण 'घर' म्हणतो.

हवा, पाणी आणि अन्न यांची प्रत्येक जीवमात्रांस अतिशय जरूरी आहे. त्यांवरच तो जगूं शकतो. त्यांच्याशिवाय जगणें कोणासही शक्य नाहीं. या तीन गोष्टी म्हणजेच त्याचें जीवन! पण याशिवाय आणखी एका गोष्टीची त्यास जरूरी भासते. ती गोष्ट म्हणजे आसरा! राहण्यासाठीं तयार केलेलें घर!

## गुहा :

फार फार वर्षांपूर्वीं माणूस जनावरांप्रमाणेंच इकडे तिकडे भटकत होता. ऊन, पाऊस, थंडी यांच्यापासून स्वतःचें रक्षण करण्यास तो असमर्थ होता. मिळेल त्या ठिकाणीं उघड्यावरच तो विश्रांति घेई अगर रात्र काढी.

पुढें तो कळप करून राहूं लागला. आपलीं बायकामुलें घेऊन तो स्वतंत्र राहूं लागला. पण त्यावेळीं त्याला क्रूर जनावरांची भीति वाटूं लागली. शिवाय कळपाकळपामध्यें भांडणें माजत व चकमकी होत. तेव्हां क्रूर जनावरें व भांडणारीं माणसें हे त्याचे शत्रु झाले. या शत्रूपासून स्वतःचें आणि बायकामुलांचें रक्षण व्हावें; तसेंच ऊन, वारा, पाऊस, थंडी इत्यादिपासून त्रास होऊं नये म्हणून तो गुहेंत राहूं लागला. गुहा ही माणसाची पहिली राहण्याची जागा झाली. माणसाचें पहिलें घर म्हणजेच गुहा!

५८



## झाडावरील घर :

ही गुहा म्हणजे जनावरांची मूळची राहण्याची जागा असल्यानें या गुहेमध्यें राहूनही माणसाची भीति कमी झाली नाहीं. अधूनमधून जनावरें येत आणि गुहेंत शिरत. गुहेंतून हकालपट्टी झाल्यानें आणि जमीनीवर राहण्यांत सुरक्षिता नसल्यानें माणसानें आपलें घर झाडावर नेलें. शिडीनें तो वर जाई आणि खालीं येई.

## झोपडीचा जन्म :

पुढें माणसानें कुत्रा, घोडा, गाय इत्यादि जनावरें माणसाळलीं. दगडांचीं हत्यारें तयार केलीं. पूर्वीचा भित्रेपणा जाऊन तो शिकारी



बनला. क्रूर जनावरांचा त्रास कमी झाल्यावर त्यानें जमिनीवर लहान लहान झोपड्या बांधण्यास सुरवात केली. पक्ष्यांचीं घरटीं पाहून त्यानेंही झाडांच्या फांद्यांचें झोपडें तयार केलें. काठ्या कुटक्या, गवत हीं एकमेकांत गुंतवून व त्यांचीं वरील टोकें एकत्र बांधून त्यावर मारलेल्या जनावरांचीं कातडीं पसरून देत. आपल्या पूर्वजांची हीच पहिली झोपडी!

## घराचा जन्म :

यानंतर माणसानें मातीच्या झोपड्या बांधल्या. या मूळच्या झोपड्यामध्यें निवाऱ्याशिवाय दुसरी कोणतीच सोय नव्हती. ही जागा स्वच्छ असावी तिचें सौंदर्य वाढवावें अशी तर त्यांची मुळींच



कल्पना नव्हती. या झोपडीस खिडक्या मुळींच नव्हत्या. दार असें पण तेंही फार ठेंगणें. झोपडींतील आंतील बाजू बरीच गलिच्छ असे. आंतमध्यें सूर्यप्रकाश शिरत नसे. स्वच्छ हवाही खेळत नसे. पुढें झरोकें पाडण्यांत आले. लाकूड, दगड, चुना यांचा उपयोग होऊं लागला. झोपड्यांचें रूप पालटून त्यांची शोभा वाढली. झोपड्यांचें घरांत रूपांतर झालें. या घरामध्यें विविध सुधारणा झाल्या, अनेक सोयी करण्यांत आल्या.

## इतिहास – भूगोल :

घरांची माहिती व त्यांत झालेला हा निरनिराळा बदल म्हणजेच घरांचा इतिहास! आजच्या जगाच्या इतिहासाचा तो एक मह-

त्याचा भाग आहे. घरांची बांधणी व घडण यांचा बारकाईनें अभ्यास करणें म्हणजे भूगोलाचें ज्ञान करून घेणें होय. देशांदेशांतील घरें विविध बांधणीची असतात. तेथील हवामान, भौगोलिक परिस्थिती आणि आर्थिक राहणीचें मान लक्षांत घेऊनच हीं घरें बांधलीं जातात. एवंच आपलें घर म्हणजेच आपला इतिहास आपला भूगोल होय !

## बांधणी :

राजकीय स्थिति, हवामान, जागा व आर्थिक स्थिति, यांवर घरांचें बांधकाम अवलंबून असते.

महाराष्ट्रांत तीनशें वर्षांपूर्वी मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळें घराच्या भिंती किल्ल्याच्या तटाप्रमाणें उंचच्या उंच बांधीत. त्यांत उतरते झरोके ठेवीत. उद्देश हा कीं, आंतून बंदुकीचा उपयोग करतां यावा.

खानदेशांत प्रत्येक घराला वर गच्ची असते. याचें कारण हें कीं तिकडे उन्हाळा जास्त असल्यानें रात्रींच्या वेळीं गच्चीवर झोपतां यावे व उकाड्याचा त्रास कमी व्हावा.

न्यूयॉर्क शहराला व्यापारी व राजकीय महत्त्व आल्यानें तेथील वस्ती झपाट्यानें वाढूं लागली. परंतु जागा अपुरी असल्यानें आहे त्याच आकुंचित जागेत उंच उंच घरें बांधण्याची जरुरी वाटूं लागली. अनेक मजल्यांच्या इमारती हें तेथील एक वैशिष्ट्य होऊन बसलें आहे.

वैयक्तिक आर्थिक परिस्थितीनुसारही कित्येकदां घरें बांधलीं जातात. महायुद्धानंतर अफाट खर्चामुळें कांहीं देशांचें आर्थिक मान एकदम

खालीं आलें. हलाखीची स्थिति प्राप्त झाल्यानें साधेपणाचा उगम झाला. फारसा पैसा जवळ नसल्यामुळें कमी जागेंतच अल्पशा खर्चांत साध्या बांधणीचीं घरें रूढ होऊं लागलीं. भव्यपणा, कलाकुसर, सुखसोयी या सार्‍या गोष्टी जाऊन त्याऐवजीं सुटसुटीतपणा व साधेपणा या गोष्टी आल्या. साधेपणांत देखील एक वेगळेंच आकर्षण आलें.

## शिल्पशास्त्र :


जेव्हां मनुष्याला सृष्टपदार्थांचें पूर्ण ज्ञान झालें व त्यांचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हें करून चुकलें त्याचवेळीं कलादृष्टि निर्माण झाली. विविध समाजांतील वर्गभेदानुसार, आर्थिक परिस्थितीनुसार घरांचें बांधकाम विविधरीत्या होऊं लागलें. प्रत्येक समाजांतील लोकांच्या इमारतीची ठेवण बदलत गेली.

आजच्या यन्त्रयुगांत घर बांधण्याच्या बाबतींत अमुक एक अशक्य अशी गोष्टच नाहीं. तसेंच दळणवळण सुलभ झालें असल्यानें एका राष्ट्रांतील इमारती बांधण्याची विशिष्ट पद्धत आतां त्याच एका राष्ट्रापुरती राहिली नसून जगांतील सर्व राष्ट्रांत निरनिराळ्या बांधणीचे नमुने पाहावयास सांपडतात. त्या त्या देशांत ज्या ज्या राजवंशांचीं राज्यें झालीं त्याप्रमाणें शिल्पकामांतही फेरफार होत गेला आहे. हिंदुस्थानांत मुसलमान व इंग्रज यांच्या राजवटीमुळें त्यांच्या पद्धतिनुसार अनेक इमारती झालेल्या आहेत. खुद्द इंग्लंडमध्यें देखील दर शतकांत या बाबतींत फरक पडत गेला आहे.

याशिवाय एखादा शिल्पकलाकुशल असा निघतो कीं त्याच्या काळच्या प्रचलित रूढीला बाजूला सारून एक नवीन कल्पनांची निराळ्या पद्धतींतील सौंदर्याची नेमकी उचल करून तो अभिनव शिल्पाचा नमुना तयार करतो. त्याच्या मार्गांत प्रचलित वास्तुशास्त्र आड येत नाहीं. लंडनमधील "व्हाईट हॉल" ही इमारत जरी इंग्लंडमधील असली तरी ज्यावेळीं ती बांधली गेली त्यावेळीं इंग्लंडमध्यें रूढ असलेल्या बांधकामाच्या पद्धतीचा त्यांत मागमूसही नाहीं. या इमारतीचा कल्पक इटलींत शिल्पशास्त्राचा अभ्यास करून आला होता. त्यानें इटलींतील जुन्या प्रख्यात इमारतींच्या धर्तीवर ही इमारत बांधली. आपल्या इकडील ताजमहाल बद्दलही असेच म्हणतां येईल. परंतु अनुकरणानें ही एकाद्या देशांत इतर देशांतील इमारतींच्या नमुन्यानुसार इमारती बांधल्या जात असतात.

## विविध नमुने :

आज या जगांत अनेक प्रकारचीं घरें तुम्हांस पहावयास मिळतील. सुधारलेल्या अमेरिकेंत गगनचुंबी इमारती आहेत तर मागासलेल्या आफ्रिकेंत अद्यापि गवताच्या झोपड्या आहेत. बर्फाळ प्रदेशांत बर्फाचीं घरें आहेत तर कालव्याच्या प्रदेशांत पाण्यावर तरंगणारीं घरें आहेत. पृथ्वीप्रदक्षिणा करून हीं सारीं लहानमोठीं घरें प्रत्यक्ष पहाणें म्हणजेच घरांची उत्क्रांति चलच्चित्रपटाप्रमाणें पाहाणें होय. ही माहिती तुम्हांस भारीच मनोरंजक वाटेल. चला तर मग निघाच या प्रवासाला !



### हिंदुस्थान :

आपल्या देशांत जगप्रसिद्ध अशी 'ताजमहाल' ही इमारत आहे. तिच्या तोडीची इमारत जगामध्यें इतरत्र सांपडणार नाहीं. शिल्पशास्त्राचा तो एक अप्रतिम नमुना आहे. आपल्या देशांत अनेक लहानमोठीं संस्थानें आहेत. या संस्थानांच्या राजधान्या म्हणजे ऐश्वर्यपूर्ण इमारतींचें व कलाकुसरीचें अगदीं माहेरघरच. बडोदे, ग्वाल्हेर, म्हैसूर इत्यादि मोठमोठीं शहरें या राजशाही आणि विलासी महालामुळें प्रेक्षणीय गणलीं जातात. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, यासारखीं आंग्लाईमध्यें वाढलेलीं शहरें देखील मनोवेधक इमारतीमुळें प्रसिद्ध झालीं आहेत.

तथापि हा देश शेतीप्रधान आहे. शेंकडा नव्वद लोक खेड्यांत राहतात. तेथे राहणारा शेतकरी-कामकरी वर्ग अक्षरशः निर्धन आहे. त्यांचीं घरें म्हणजे कुडांच्या भिंती असलेल्या झोपड्या. या झोपडीच्या आसपास जरी एकादे-वेळीं सुबलक जागा असली तरी तिच्या आंत अगदीं वेगळेंच स्वरूप पहावयास मिळतें. जेमतेम आंत उभें राहतां येईल एवढीच त्या झोपडीची उंची असते. उंच इसमाच्या डोकयास त्या झोपडीचें छप्पर लागणें शक्य आहे. झोपडींत शिरावयाचे म्हणजे वांकूनच आले पाहिजे. नाहींतर कपाळ-मोक्षच व्हावयाचा. आंतमध्यें पुरेशा खिडक्या झरोके नसल्यानें हवा कोंदून जाते. सूर्यप्रकाश क्वचितच आंत येतो. पावसाळ्यांत आंतील जमीन ओलसर राहाते. झोपडीच्या एका कोपऱ्यांत चूल व भांड्याची उतरण तर दुसऱ्या कोपऱ्यांत बिछायत. तेथेंच जेवण, तेथेंच झोप. पुरुष, स्त्रिया आणि मुलें या सर्वांची बसण्या उठण्याची तीच जागा. स्वयंपाक सुरु झाल्यावर जेव्हां सबंध झोपडींत धूर कोंदतो तेव्हां स्त्रियांचा जीव कासावीस होतो. मुलें बाहेर खेळूनच दिवस काढतात. पुरुष शेतावरच असतात. पण स्त्रिया मात्र याच झोपड्यांत आपला सारा वेळ-नव्हे सारें जीवन-काढतात. देह आडवा झाला म्हणजेच त्या या झोपडीच्या बाहेर यायच्या! आपल्या देशाचें मूर्तिमंत दारिद्र्य म्हणजेच हीं घरें! या दारिद्र्याच्या जोडीला अज्ञानही त्या बिचाऱ्यांचें दुःख आणखी वाढवितें.

कवि दत्त म्हणतात—

बहु दिवसांच्या जुन्या कुडाच्या भिंती
कुजुनी त्यां भोकें पडती।

त्यामधुनी त्या दाखविती जगताला
दारिद्र्य आपलें बाळा ॥
हें कळकीचें जीर्ण मोडकें दार
कर कर कर वाजे फार ।
हें दुःखानें कण्हुनि कथी लोकाला
दारिद्र्य आपलें बाळा ॥

दत्त कवीनें किती यथार्थ हें वर्णन केलें आहे !

**तोडा :**

हिंदुस्थानांतील कांहीं डोंगराळ प्रदेशांत अद्यापिही कांहीं रानटी लोकांची वस्ती आहे. निलगिरी पर्वतावर तोडा नांवाचे रानटी लोक राहतात. हे लोक दुधाचा व्यापार करतात. दुध हेंच त्यांचें मुख्य अन्न होय. आणि म्हणून दूध देणाऱ्या म्हशींना ते पूज्य मानतात. हे लोक कळपानें राहतात. आणि सर्व झोपड्यांच्या सभोंवतीं श्वापदांपासून दुभत्या जनावरांचें संरक्षण



व्हावे म्हणून लांकडी भक्कम कुंपण घालतात. आसपासचें गवत संपुष्टांत आलें कीं ते आपला तळ हालवितात आणि दुसरीकडे अधिक गवताळ रानांत आपला मुक्काम ठोकतात.

या तोडा लोकांच्या झोपडीचा आकार एखाद्या अर्धे पिपासारखा असतो. त्याला खिडक्या मुळींच नसतात. दारही जमिनीला लागून अगदीं वसकें असतें. हे लोक घरांत शिरतांना रांगतच आंत जातात. नवख्या माणसाला या घरांत शिरल्यावर तेथील अंधारामुळें त्याला कांहींच दिसणार नाहीं. पण नेहमीच्या सरावामुळें तोडा लोकांचे व्यवहार आंतमध्यें व्यवस्थित होऊं शकतात.

## ब्रम्हदेशः

आपल्या देशाच्या थेट पूर्वेस ब्रम्हदेश आहे. तेथें बहुतेक गांवें नदीच्या कांठीं वसलेलीं आहेत. पावसाळयांत नदीला पूर येऊन गांव वाहून जाऊं नये म्हणून गांवांतील घरें खांब उभे करून त्यांवर बांधलेलीं असतात. घरें उंचावर बांधल्याचा दुसराही एक फायदा असा होतो कीं, त्यामुळें घरांत साप वगैरे येण्याची फारशी धास्ती नसते. त्यांचीं घरें कळकाची व लांकडाची केलेली असून त्याला मजले नसतात. कारण माडीवर चालणें म्हणजे खालच्या मजल्यांत राहात असलेल्या माणसांच्या डोक्यावर नाचण्यासारखे आहे, असें तेथील लोकांना वाटतें. या घराभोंवतीं जिकडे तिकडे वेलीं व फुलें आहेत. कुंपणें घ्या. भिंती घ्या, झाडें घ्या कोठेंही फुलें नाहींत असें होत नाहीं. शिवाय तीं आपल्याकडील फुलांपेक्षां कितीतरी मोठीं व निरनिराळया रंगांचीं असतात.

या लोकांना फुलांचा फारच शोक असून त्यांच्या अंगांवर नेहमीं फुलें असतात.


**चीन:**

जगामध्यें कुठेंही इतरत्र पहावयास मिळणार नाहीं अशा विशिष्ट बांधणीचीं घरें तुम्हांला चीन व जपान या दोन देशांत पहावयास मिळतील.

चीन देशांत वस्ती फार दाट आहे. गांवें व शहरें अतिशय जवळ जवळ आहेत. गांवांतील घरांना पाहिजे तेवढी जागा मिळत नाहीं. जागेच्या अभावी रस्तेही अरुंद, खेचाखेचीचे व अंधारी असतात. समोरासमोरील घरांवर वांवूचे वासे टाकून सावलीकरितां त्यावर चटया टाकतात. त्यामुळें रस्त्यांत अधिकच अंधार पडतो. बहुतेक खेडीं व शहरें नद्यांच्या कांठींच वसलीं आहेत. येथें लाखों माणसें नद्यावरच नावांत घरें करून आपल्या कुटुंबासह राहतात. एकट्या पर्ल नदीवरच तीस लाख लोक राहतात. कित्येक ठिकाणीं या इतक्या नावा उभ्या असतात कीं, दुरून पहाणाऱ्यास डोलकाठ्यांचें रानच उभे असल्याचा भास होईल.

जंक्स नांवाच्या नावेवर मध्यभागीं एक अर्ध-वर्तुळाकार घर असतें. त्याचा वरचा भाग जाड व चटयांनीं आच्छादलेला असतो. त्यांचे सर्व व्यवहार नावेवरच चालतात. भिकारीही नावें-तूनच भीक मागत हिंडतात. मुलें नावेवरच खेळतात. खेळतांना तीं नदींत पडली तर बुडूं नयेत म्हणून त्यांच्या पाठीला लहानशीं पिपें बांधतात. चिनी मुलांना पाण्याचें भय वाटत नाहीं

चीनमध्यें घरें बहुधा एक मजलींच असतात. घराच्या भिंती श्रीमंत मनुष्य असेल तर भुरकट रंगाच्या विटांच्या व गरीब असेल तर मातीच्या अगर बांबूंच्या असतात. घरें बांधतांना कळक किंवा बांबू यांचाच उपयोग जास्त करतात. घरांचें छप्पर काळया रंगाच्या कौलांचें अथवा



चटयांचें असतें. चिनी बंगल्याच्या छपरांचें कोपरे ग्वाल्हेरी पगडीचें टोकाप्रमाणें वर वळलेले असून मध्यभागीं शिखरासारखें असतें. आणि त्यावर कळसही असतो. श्रीमंत मनुष्याचें घर म्हणजे एक छोटेसें खेडेंच असतें. कारण तें एक मोठें घर असून अनेक कौलारु खोल्याचें केलेलें असतें. त्यांत कळकांचा उपयोग अधिक केलेला असतो. म्हणून आग लागण्याची भीति फार. त्यासाठीं दालनें एकमेकांस लागून न बांधतां तीं अलग बांधावीं लागतात.

चिनी घराच्या मध्यभागीं एक भट्टी, चूल अथवा शेगडी असते. तिच्याभोंवतीं रुंद असा विटांचा कट्टा बांधलेला असतो. त्यास एका बाजूस धुराडें ठेवलेलें असतें. शेगडीचा वरचा भाग गरम राहतो म्हणून चिनी लोक हिंवाळयांत त्यावर बसतात, जेवतात व झोपतात. मोठ्या

घरांत एक खोली पितृपूजेकरितां राखून ठेवतात. आणि तेथें ते नित्य नियमित पितृपूजा करतात.

बहुतेक चिनी शहरांभोवतीं तट असतो. पेकींग शहराभोंवतीं तर तीन तट आहेत. शहरांत जाण्यास वेशींतून जावें लागतें. सर्व घरें एक मजली असल्यानें ती फार विचित्रच वाटतात. रस्ते अगदीं अरुंद व त्यांत भयंकर गर्दी. गाढव, उंट, खेचर यांच्या गाड्या, रिक्शा अथवा ढकलगाड्या यांपैकीं कोणत्या तरी साधनाचा अवलंब करून जाणारी मंडळी चीनच्या रस्त्यावर क्षणोक्षणीं दिसतात.

चिनी मनुष्याचें घर म्हणजे एक कारखानाच असतो. हे लोक घरींच सूत काढतात, कापड विणतात. चटया, पंखे, खुर्च्या, टेबलें, पाट्या, मातीचीं भांडीं, कागद वगैरे जिन्नस तयार करतात. रेशमी किडे पाळून रेशीम काढतात.

शहरांतील राहणारे चिनी लोक पाश्चिमात्याप्रमाणें सुशिक्षित व टापटीपीनें राहणारे आहेत. कलाकुसरीमध्यें ते पूर्ण पारंगत आहेत. शहरांशहरांतून कलापूर्ण वस्तू तुम्हांला हरएक ठिकाणीं दृष्टीस पडतील. घरें, घरांतील लांकडी सामान, रेशमी पडदे इत्यादिवरील नक्षीकाम तुमचें मन मोहून टाकील. तेथील रस्ते रुंद असून इमारती पाश्चिमात्य पद्धतीच्या दिसतील.

परंतु हिंदुस्थानप्रमाणेंच चीनमध्यें खेड्यांत राहणारांची संख्या अधिक आहे. चिनी शेतकऱ्यांचीं घरें मात्र आपल्याकडील शेतकऱ्यांप्रमाणें आरोग्यरहित असतात. दगडामातीची आणि बिगर खिडक्यांचीं घरं त्यांना वापरण्यास पुरेशी नसतात. म्हणून ते घरापुढील रस्त्याची जागा ऐसपैस व बिनदिक्कत वापरतात. यामुळें अगोदरच

अ. प्र. ग्र. ठाणें, वाचनालय शाखा.
वा. क्र. ११३८८ नं. दि ..............
बा - वा ........ ५८


अरुंद असलेल्या रस्त्यावर रहदारीला मोठाच अडथळा होतो.

चिनी खेड्यांतील प्रत्येक कुटुंब पूर्ण स्वतंत्र व स्वावलंबी आहे. प्रत्येक खेड्यांत एक देऊळ, एक शाळा, एक जुनाट पद्धतीचें शालागृह, एक दारूचा गुत्ता ही असायचीच ! प्रत्येकजण आपल्या कामांत अगदीं चूर असतो. सुधारणा होण्यास, सार्वजनिक चळवळी करण्यास वाव कसा तो येथें सांपडायचा नाहीं. गांवचा रस्ता उन्हाळ्यांत गुडघाभर धुळीनें तर पावसाळ्यांत चिखलानें भरलेला असतो.

## जपानः

जपानी लोकांचीं घरें मोठीं सुंदर असतात. खरोखरच जगामधील विविध घरांमध्यें दिखाऊ-पणांत जपानी घरांचाच क्रम पहिला लागेल.

जपानीं घरें एक मजलीच असतात. घराचें छप्पर काळ्या कौलांचें अथवा बांबूचें असतें. या छप्पराला आधार लहानसहान लाकडी खांबांचा असतो. हे खांब व छप्पर आधीं तयार करतात व मग जमिनीपासून एक फूटावर चौकटींत बसविलेल्या व मागें पुढें सरकविता येणाऱ्या जाड कागदाच्या व लाकडाच्या पातळ भिंती बसवितात. दिवसा कागदाच्या फळयांच्या व रात्रीं लाकडाच्या पातळ फळयांच्या भिंती बसवितात. भिंतींना नाना आकाराच्या खिडक्या असतात. त्यावर जपानी लोक आपलें हस्तकौशल्य खर्च करून त्या शक्य तितक्या चित्रांनीं व वेलबुट्यांनीं सुशोभित करतात. दिवसा बहुतेक सर्व भिंती एकांत एक घड्या करून ठेवतात. त्यामुळें दिवसा जपानी घर म्हणजे एक लांबच लांब दालन दिसतें.



भिंती उभ्या असतात. घराला रस्त्याच्या बाजूला आडोशाकरितां भिंती वगैरे कांहीं नसतात. थंडी फारच असेल तरच पुढील कागदी भिंत सरकवून तिचा आडोसा करतात. एरवीं रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या माणसांना जपानी घरांत चाललेला सर्व व्यवहार दिसतो.

इकडे धरणीकंपामुळें जमीन वारंवार हादरते. अशावेळीं दगडाविटांचीं घरें पडतील व माणसें मरतील म्हणून अशीं घरें बांधलीं जातात.

रात्र झालीं कीं भराभर लाकडी भिंती मागेंपुढें सरकवून पांच मिनिटांत जरुर तेवढ्या लहान मोठ्या खोल्या तयार करतात. इतकें हें जपानी घर सुटसुटीत असतें.

खोल्यांमधून पिवळ्या रंगाच्या चौकोनी चटया टाकलेल्या असतात. खोल्या चौकोनी आकारा-

फक्त स्नानगृह व स्वयंपाकगृह यांच्या कागदी

च्याच असल्यानें चटयांच्या संख्येच्या प्रमाणांत त्या त्या खोल्यांना ओळखण्यांत येते. जसे चार चटयांची खोली-आठ चटयांची खोली इत्यादि.

गरीबांचें व श्रीमंताचें घर याच पद्धतीचें. फक्त श्रीमंतांच्या घराची तक्तपोशी गुळगुळीत लाकडाची केलेली असून त्यावर, खांबावर व भिंतीवर सोनेरी व रंगीबेरंगी नक्षीकाम केलेलें पहावयास सांपडेल.

घरामध्यें खुर्च्या, टेबलें, कपाटें, जाजमें इत्यादि अवजड सामानांची गर्दी दिसणार नाहीं. त्याऐवजीं जाड जाड मऊ व पांढऱ्या स्वच्छ चटया आंथरलेल्या असतात. त्यावर जपानी लोक बसतात. रात्रीं याच चटयावर एकावर एक अशा दोन चार रजया आंथरतात व त्यावर निजतात. रात्रीं भिंतीला एक चित्रविचित्र रंगाचा कंदिल टांगतात. तो दिवा रात्रभर जळत असतो.

घराचे मध्यभागी चर खणून एक चौकोनी शेगडी तयार करतात. त्यावर स्वयंपाक करतात. थंडीच्या दिवसांत शेगड्याकीरतां लहान चिनी मातीच्या भांड्यांत निम्मी राख घालून त्यावर निखारे ठेऊन शेगडी तयार करतात. तीवर शेकून थंडीचें निवारण करतात.

जपानी लोक स्वच्छताप्रिय आहेत. त्यांच्या घरांत कोठेही केरकचरा वगैरे घाण आढळणार नाहीं. सर्व वस्तु नीटनेटक्या व व्यवस्थित ठेवलेल्या आढळतील. स्वयंपाक घरांतील लाकडी जमीन तर धुवुनपुसून आरशासारखी स्वच्छ केलेली असते. आणि म्हणून घराच्या दरवाज्याजवळ तुम्ही जातांच तुम्हाला तुमचे जोडे बाहेरच काढावे लागतील. पाश्चात्यपद्धतीप्रमाणें जोडे घालून तुम्हाला घरांत शिरतां येणार नाहीं. आपल्या स्वच्छ असलेल्या घरांना रस्त्याचें स्वरूप

येऊं नये अशी त्यांची इच्छा असते. जोडे घालून आंत जावयाचे असल्यास मुद्दाम तयार केलेले गवती जोडे घालून आंत जातां येईल.

जपानी लोक फुलांचे व सृष्टिसौंदर्याचे भोक्ते आहेत. घराचे आवारांत ते सुंदर बगीचे तयार करतात. एवढेंच काय पण खोल्या खोल्यामधून नक्षीदार चिनीमातीच्या कुंडीमध्यें सुंदर रंगी-बेरंगी फुलें ठेवून खोलीची शोभा वाढवितात. जणूं काय बागेशिवाय व फुलांशिवाय जपानी घर पुरेंच होत नाहीं.

जपानी शहरांतला रस्ता मोठा प्रेक्षणीय वाटतो. दुतर्फा असलेल्या दुकानाच्या पुढें रंगी-बेरंगी निशाणें, पाट्या, कागदी दिवे इत्यादि वस्तू टांगलेल्या असतात. रस्त्यानें एखाद्या उंच काठीवर कागदी वस्तू टांगून त्यांची विक्री करणारे अनेक फेरीवाले आढळतात. स्त्रियाही उंची पोषाखांत मुलांना पाठीशीं बांधून बाजार-हाट करतांना दिसतील.

अगदीं अलिकडे मात्र पाश्चात्य पद्धतीवर तीन तीन चार चार मजली लोखंडी व सीमेंट कांक्रीटचीं घरें बांधण्यास मोठमोठ्या शहरांतून सुरवात झाली आहे. आंतील सजावट जपानी पद्धतीचीच असते.

मलाया:


मलाया हा देश आशिया खंडाच्या आग्नेय बाजूला आहे. ब्रह्मदेश प्रमाणें येथील घरेंही पाण्यावरच बांधलेलीं असतात. सर्व घरें उंच उंच खांब पाण्यांत पुरुन त्यांवर बांधलेलीं असून तीं पाण्यावर तरंगत असल्यासारखीं दिसतात. एका घरांतून दुसऱ्या घरांत जाण्याकरितां लाकडी शिड्या टाकल्या असून त्या ओलांडून जातांना एका बोटींतून दुसऱ्या बोटींत गेल्यासारखें वाटतें. घरांच्या भिंती बांबूच्या केलेल्या

असून घरावर कौलाऐवजीं ताडामाडाचे झांप अगर पोफळीच्या सांवल्या घातलेल्या असतात.

खालील पाणी व घरांतील तळजमीन यांत फारसें अंतर नसल्यामुळें रात्रीं कुशीला वळलें कीं खालच्या पाण्याचा 'चुवक्क चुवक्क' आवाज कानीं येतो. एखादे वेळीं पालथे वळून भेगांतून खालीं पाहूं लागलों तर पाणी देखील दिसतें. प्रथम प्रथम पाण्याची भीति वाटणें शक्य आहे. पण पुढें सरावानें त्याचें कांहीं वाटेनासें होतें. कित्येकदां तळमजल्यावर शेळया, डुकरें, कोंबड्या वगैरे ठेवतात.

## तुर्कस्थानः

या देशांतील माणसें भारी आडदांड आहेत. त्यांचा शेजारच्या लोकांशीं नेहमींच खटका उडतो. या तुर्कस्थानच्या सरहद्दीवर राहणारे लोक आपलीं घरें एखाद्या गढीप्रमाणें मजबूत बांधतात. या घराची बाहेरील बाजू २५ ते ३० फूट उंच असते. आंत येण्यास फक्त एकच दार



असते. लोखंडी गजानें तें दार भक्कम केलेलें असते. त्यामुळें आंत सहसा दुसऱ्या कोणास

शिरतां येत नाहीं. अशा या भिताडावर घरें बांधलीं जातात. आंतील खालच्या मोकळ्या जागेंत जनावरें ठेवण्यांत येतात. एका खोलींतून दुसऱ्या खोलींत यावे म्हणून बाहेरच्या बाजूला फळ्या टाकून मोडकी तोडकी गच्ची बनविलेली असते. त्यावरून लहान मुलें देखील विनदिक्कत जाऊं शकतात.

तिबेटः



हिंदुस्तानच्या उत्तरेस तिबेट नांवाचा देश आहे. तिबेटचे पठार असा त्याचा उल्लेख होतो. येथील लोक डोंगराच्या उंच जागीं घरें बांधून राहतात. हे लोक धर्मानें बौद्ध आहेत. लामा धर्म-गुरु व त्यांचे मठ अशा उंच पठारावर आहेत. तिबेटमधील घराच्या भिंती वरच्या बाजूला निमूळत्या होत गेलेल्या असतात.

पर्शियाः

पर्शियन घरें लांबून जरी साधीं दिसलीं तरी आंतमध्यें सर्व सुखसोयींनीं सुसज्ज अशी तीं असतात. खोल्यांतून उंची जाजम आंथरलेले असतात. आणि खिडक्यांनाही नक्षीदार व जाळीदार पडदे असतात. घराचे आंत मोठे आवार असून तेथें फुलझाडें लावलेली दिसतील. गरीब पर्शियन लोक पुष्कळदा रस्त्यावर सारा वेळ काढतात. सुतार, शिंपी, न्हावी इत्यादि लोकांचीं दुकानें बहुधा रस्त्यावर थाटलेली असतात.

पॅलेस्टाईन:

शेतकऱ्याचें घर म्हणजे एक मोठी खोलीच. या खोलींत सर्व माणसें व जनावरें राहतात. खोलीची तीनचतुर्थांश जागा माणसांना व बाकीची जागा जनावरांच्या उपयोगासाठीं आणतात. जनावरापेक्षां माणसाची जागा जरा उंच असते.

उंचवट्यावर दगड विपुल असतात. म्हणून तेथील घरांच्या भिंती दगडांच्या केलेल्या असतात. पण खालीं मैदानावर दगड कमी व माती अधिक म्हणून तेथील घरांच्या भिंती चिखलाच्या बांधतात. मैदानावर इमारती लाकडाचीं झाडें असतात. तेथील घरांच्या पश्चिम बाजू पश्चिमेकडून येणाऱ्या पावसापासून सुरक्षित रहाव्यात म्हणून लाकडी कुडाच्या बांधतात. छपरावर लाकडी तुळया घालून त्यावरून चिखल माखून माळवदें तयार करतात. हिंवाळ्यांतील पावसाच्या अखेरीस तीं माळवदें गवतानें हिरवीगार होतात. हें गवत खातांना माळवदावर पुष्कळदां बकरीं दिसतात.

उंचवट्यावरील छपरें दगडांची व चुन्याची बांधावी लागल्यानें तीं सपाट असूं शकत नाहींत. तीं मशिदींच्या गोलघुमटासारखींच बांधावी लागतात. त्यास पुष्कळ दगड व चुना लागल्यानें ते घुमट अतिशय वजनदार असतात. अर्थात त्यांना तोलण्यास त्यांच्या खालच्या भिंतीही जाड असाव्या लागतात. म्हणून येथील घरांच्या भिंती कमीत कमी तीन फूट तरी रुंदीच्या असतात. या जाडीमुळें साहजिकच येथील ओसाड प्रदेशांत लुटारू टोळयापासून संरक्षण होतें. उन्हाळ्यांत आंतील बाजू थंड व हिवाळ्यांत उबदार राहूं शकते. घर लुटारू टोळयापासून सुरक्षित रहावें

या दृष्टीनेंच बांधलेलें असल्यानें त्यास धुराडें अथवा खिडक्या असत नाहींत. खिडकी असलीच तर ती इतकी उंच असते कीं शत्रूला त्या उंच खिडकीवाटे खोलींत गोळी झाडतां येत नाहीं. या खिडकीचाच उपयोग धुराड्यासारखा होऊं शकतो. त्यांतूनच काय येईल तेवढी हवा व प्रकाश मिळायचा. यांना तावदानें असत नाहींत. गरीबाच्या घरांचे दरवाजेसुद्धां संरक्षणार्थ अगदीं बळकट व जाड लाकडाचे केलेले असतात. वरील परिस्थितीमुळें घर इतकें अंधारें, अडचणींचें व धुरानें भरलेलें असतें की एखाद्याला तेथें ऱ्हावेंसेंसुद्धां वाटणार नाहीं. म्हणून हे लोक सदासर्वकाळ घरांत रहात नाहींत कीं निजतही नाहींत. जरूर तेव्हांच व तेवढाच त्याचा उपयोग करतात.

घराचा घुमट बांधून झाला कीं तो ज्या चार भिंतीवर आधारलेला असतो त्या तशाच वरपर्यंत घुमटाच्या उंचीपर्यंत बांधतात. घुमट व भिंतीच्यामधील खोल जागा दगडामातींनीं भरून काढून सपाट करतात. येथें उन्हाळयाच्या रात्रीं निजतात व थंडगार हवेच्या दिवशीं बसतात. यावर कधीं कधीं द्राक्षांचे वेलीचा मांडव घालतात व राहण्यास एक खोलीच तयार करतात. येथेंच खरोखर हे लोक वर्षांतील बरेच दिवस व बराच वेळ राहतात. येथें येण्यास घराचे बाहेरूनच एक कायमचा जिना केलेला असतो. या छपरावर कुटुंबास लागणाऱ्या जिनसांची सांठवण केलेली असल्यानें वर येण्यास शिडीचाच उपयोग अधिक श्रेयस्कर ठरतो. कारण ती जरूर तेव्हां लावतां येते व काढतांही येते. शत्रूपासून माणसाचें, धान्याचें, जनावरांचें, सर्वांचेंच संरक्षणही होतें.

पावसाळ्यांत या घरांतून राहाणें अगदीं जिवा-घर येते. जनावरें जरी बाहेर गवतावर चरत असली तरी घरांचीं छपरें गळत असतात व सारें घर पाण्यानें ओलें झालेलें असतें. पण ही स्थिति सहसा एकदोन दिवसापलिकडे टिकत नाहीं.

## आफ्रिका

भूमध्य समुद्राचे बाजूला असलेल्या अल्जेरिया, मोरोक्को या देशांतील घरांना छपरें नसल्यानें उन्हाळ्याचे दिवसांत तेथील लोक या सपाट माथ्यावर रात्र काढतात. या घराच्या तळमजल्यावर रस्त्याचे बाजूला बहुधा दुकानें असतात. या दुकानांत सर्व प्रकारचा विक्रीचा माल ठेवलेला असतो. कित्येकदां कांहीं दुकानदार दुकानापुढील मोकळ्या जागेंत ठाण मांडून बसतात आणि तेथेंच आपला माल तयार करतात.

दक्षिण आफ्रिकेंत काफीर जातीचे रानटी लोक राहतात. त्यांचीं घरें बांबू व काठ्या यांचीं बनविलेलीं असतात. गोल घुमटाप्रमाणें त्याचा आकार असतो. या घरांना क्रॉलस असें



क्रॉलस

नांव आहे. श्वापदांचा त्रास होऊं नये म्हणून दहा पांच घराभोंवतीं लाकडी कुंपण घातलेलें असते. गुलामांचा व्यापार करणाऱ्या अरबांची धाड कांहीं कांहीं वेळेला या रानटी लोकांच्या गांवावर येते.

इजिप्त:

ब्रिटीश साम्राज्यांत इजिप्त हा देश नुकताच सामील झालेला आहे. तेथें कैरो, अलेक्झांड्रीया हीं शहरें प्रसिद्ध आहेत. तेथें तुम्हांस पाश्चात्य पद्धतीचा पेहराव करणारे व परंपरागत इजिप्तशियन पद्धतीचा पेहराव करणारेही लोक सांपडतील. जसें पेहरावांत मिश्रण दिसते; तसेंच घरांच्या बाबतींत मिश्रण पहावयास मिळते. इजिप्तशियन घराचा तळमजला बहुतेक दुकानाला भाड्यानें दिलेला असतो. घरें धाब्याची असतात. आंतमध्यें स्वच्छता मुळींच नसतें. गवताच्या गंजी व लाकडाच्या मोळया यांनीं घरांतील जागा व्यापलेली असते.

आफ्रिकेंतील सुडान हा प्रांत परवां परवांपर्यंत म्हणजे सन १८९८ पर्यंत खलिफाचे ताब्यांत होता. या सुडान मधील शेतकऱ्याच्या झोंपड्या गवताच्या केलेल्या असून त्यांचा आकार मधमाशांच्या पोवळयासारखा असतो.

## युरोप

जर्मनी:

जर्मनींतील खेड्यांतील शेतकऱ्यांचीं घरें बैठी व एकमंजली असतात. तीं साध्या दगडविटांचीं बांधलेलीं असली तरी त्यांत हवा व उजेड भरपूर खेळत असल्यामुळें तीं अगदीं टुमदार दिसतात. घरांतील खिडक्यांना व दारांना आपल्या इकडीलप्रमाणें दोन दारें नसून बाहेरून दोन व

आंतून दोन अशीं चार दारें असतात. दुहेरी दारें असल्यामुळें बाहेरील थंड हवा व आंतील उब-दार हवा या अगदीं अलग राहून आंतील थंडीचें एकंदर प्रमाण बरेंच कमी होतें. घरांतील शेग-डीचा धूर बाहेर जाण्यास प्रत्येक घरास धुराडें हें असावयाचेंच. तसेंच घरांचीं छपरें उंच. त्यास कल फार: जवळजवळ उभटच. कारण हिंवा-ळ्यांत पडणाऱ्या बर्फाचा निचरा व्हावा लागतो. छपरें कमी कलती असतील तर बर्फ खालीं निचरून जाणार नाहीं. घरांची तक्तपोशी बहु-तेक कॉंक्रीटची अगर सीमेंटची केलेली असते. ब्लॅक फॉरेस्ट व आल्प प्रदेशांतील घरें, लाकूड मुबलक असल्यानें, लाकडाचीं केलेलीं असतात. तर स्लेट पाटीच्या दगडाच्या खाणींच्या प्रदे-शांत, घराच्या भिंती व छपरेंही स्लेटचीच अस-तात. दारांवर, खिडक्यांवर व लाकूड असेल तेथें त्यावर नक्षी काढलेली असते. लाकडांना निरनिराळे आकार देऊन घर जितकें सुंदर व व डुमदार करतां येईल तितकें करतात.

खेड्यांतसुद्धां स्वच्छता फार दिसून येते. रस्ते स्वच्छ असून त्यावर कोणीही कसलीही घाण करीत नाहीं. रस्त्यांतून शान्तताही तितकीच आश्चर्य करण्यासारखी असते.

## स्वित्झरलंड:

स्वित्झरलंड म्हणजे युरोपांतील काश्मीर! बर्फाळ माथ्याचे डोंगर, हिरव्यागार दऱ्या आणि त्यांतून बाहेर पडणाऱ्या नद्या यामुळें हा देश जगांत सौन्दर्यामध्यें अग्रगण्य मानला जातो.

स्विस लोकांच्या घरांना 'चॅलेट' म्हणतात. या घराचें छपर अतिरुंद असून एकदम उतरतें असतें. घराच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर गच्च्या असून तेथें उत्तम वेली सोडलेल्या असतात. हीं

घरें लाकडाची असून खेळण्यांतलि लुटपुटीच्या घराप्रमाणें भासतात. दिसायला जरी तीं नाजूक असलीं तरी तीं भारी मजबूत असतात. हिंवाळ्यामध्यें होणाऱ्या वादळास व पडणाऱ्या बर्फास तीं तोंड देऊं शकतात. उतरत्या छपरामुळें बर्फ सहज घसरून खालीं पडतो. शिवाय गार वाऱ्यास तो अडवूंही शकतो. आंतमध्यें सदा धगधगणाऱ्या शेगडीमुळें भरपूर ऊब निर्माण होते.

हिंवाळ्यामध्यें बर्फानें सारी जमीन माखून जाते. इतकी कीं त्यामुळें तळमजल्यावर राहाणें मुष्कील होते. मग तेथील लोक अशावेळीं वरच्या मजल्याचा उपयोग करतात.

उन्हाळ्यांत स्विस लोक डोंगरावर राहावयास जातात. तेथें त्यांचीं साधी लाकडी झोपडीवजा घरें असतात. वरील हलकें छपर वादळांत उडून जाऊं नये म्हणून त्यावर मोठमोठे दगड ठेवलेले असतात. तेथें राहून ते गुरें राखतात आणि दुधदुभते विकतात.



घराच्या आसपास उंच उंच डोंगर असून ते सर्व बर्फाच्छादित असतात. ही शोभा जरी दिसावयास चांगली असली तरी ती धोक्याची असते.





उन्हाळ्यांतील प्रखर उन्हानें बर्फ वितळूं लागला कीं बर्फाचे मोठमोठे तुकडे खालीं गडगडत येतात. त्यामुळें घरें कोसळतात. केव्हां केव्हां सारा गांव उध्वस्त होतो. क्वचित बर्फाच्या वितळण्यानें पाण्याचा अति जोरदार लोंढा वहात येतो. या लोंढ्यानें सारें कांहीं वाहून जातें.

नेपल्स:

नेपल्स या देशांतील घरांच्या जवळ स्वित्झरलंड प्रमाणें डोंगर आहेत पण ते बर्फाळ नाहींत तर ज्वालामुखी! तेथील लोक ज्वालामुखी पर्वतापासून शक्य तो दूर अन्तरावर घरें बान्धून राहतात. हीं घरें अगदीं जवळ जवळ असून उंच असतात. रस्ते अगदीं अरुंद असतात. वरच्या मजल्यावर राहणाऱ्या लोकांना पुष्कळवेळां कामानिमित्तानें खालीं वर ये जा करावी लागते. त्यामुळें ते कंटाळतात. अशावेळीं हे हेलपाटे व श्रम यांचा-

वत म्हणून ते एक युक्ति योजतात. फेरीवाले फळफळावळ, भाज्या इत्यादि घेऊन रस्त्यानें हिंडतात. हे लोक वरच्या मजल्यावरच त्या फेरीवाल्याशीं चौकशी करतात. भाव पटल्यास एका टोपलींत पैसे टाकून ती टोपली दोरीनें खालीं रस्त्यावर सोडतात. मग फेरीवाला पैसे घेऊन त्या टोपलीत माल टाकतो. अशा तऱ्हेनें माल वर खेचला जातो.

दुधवाले दुधाच्या बाटल्या घेऊन न हिंडतां बकरीच घेऊन हिंडतात. ज्यांना दूध पाहिजे त्यांचे घरांत बकरीचें दूध काढून दिलें जातें.

नेपल्स जवळच ज्वालामुखी पर्वत असल्यानें दुरूनही दृश्य भीतीदायक दिसतें. सन १९०८ मध्यें एकदां हा ज्वालामुखी जिवंत झाला होता. तेव्हां नेपल्स मध्यें कित्येक दिवस धूर कोंदला होता. आणि पर्वताजवळचीं खेडीं अग्नीच्या भक्षस्थानीं पडली होती. फार फार वर्षांपूर्वी असाच एकदां ज्वालामुखी भडकला होता. आणि त्यावेळीं अस्तित्वांत असलेलीं दोन जगप्रसिद्ध शहरें—पॉम्पे व हर्क्युलेनियम—पूर्णपणें जळून गेलीं होती. पॉम्पे हें शहर रोमन लोकांनीं बांधलेलें होतें. ज्या काळांत इंग्लंड हा देश पूर्ण अज्ञानांधकरांत होता, नग्नावस्थेंत होता, जेव्हां तेथलि लोक मातीचीं घरें बांधीत होते; त्या काळांत सर्वांगसुन्दर घरें, कौशल्यपूर्ण देवळें, मोहक पुतळे, आल्हाददायक कारंजी व चित्रांनीं सजविलेल्या भिंती यांनीं हीं शहरें अगदीं गजबजून गेलीं होतीं.

## स्लाव्हाकियाः

स्लाव्ह घरांचा एक विशेष म्हणजे घराच्या मध्यभागीं एक मोठा दिवाणखाना असतो. त्याचे सभोवार प्रत्येक कुटुंबास दिलेल्या खाजगी खोल्या

असतात. कुटुंब वाढूं लागलें कीं खाजगी खोल्या वाढतात. प्रत्येक घरांत कमीत कमी तीनशें लोक राहतात इतकें तें मोठें असते. बहुतेक सर्व व्यवहार या मोठ्या दिवाणखान्यांतून होत असतो. घराभोंवतीं तट असल्यामुळे शत्रूस अशा घरावर हल्ला करणें कठीण जातें. कारण शत्रू आला असतां सर्वच लोक एकदम जमा होतात व शत्रूस तोंड देतात.

ग्रीसः

ग्रीस देश बहुतेक डोंगराळ असल्यानें तेथें शहरें फारच थोडीं व तींही बहुतेक सर्व समुद्र-कांठींच वसलेलीं आहेत. या समुद्रकांठच्या शहरांत राहणारे लोक व्यापारी, खलाशी, व नोकर पेशाचे असतात. अर्थात हे लोक बरेच श्रीमंतही आहेत.

शहरांतील या लोकांचीं घरें बरीच उंच व भव्य असतात. बहुतेक घरें दोनतीन मजली असतात. क्वचित चार मजलीही असतात. घरावर कलतें छप्पर असून त्यावर कौलें असतात. गच्च्या अथवा माळवदें फार कमी. दऱ्यांत व समुद्र-कांठीं जोराचा वारा असल्यामुळे तेथें बांधलेलीं घरें मजबूत दगडांचीं असतात. हवेसाठीं घरास मोठ्या खिडक्या पुष्कळ ठेवतात. दरवाजेही भरपूर उंच व मोठे असतात. प्रत्येक घरमालक आपल्या ऐपतीप्रमाणें घराच्या दगडावर व खांबांवर नक्षीकाम व खोदकाम करवून घेतो. ग्रीक लोक या दोन कलांचे फार भोक्ते आहेत. बऱ्याच शहरांतून टेकड्यांच्या उतरणीवर घरें असल्यानें घराचें पुढलें दार पहिल्या मजल्यावर व मागलें दार दुसऱ्या मजल्यावर अगर याच्या उलट असतें. अथेन्स सारख्या शहरांत डांबरी रस्ते आहेत. इतर ठिकाणीं बहुतेक दगडी फरशी केलेली असते. दगडी फरशी करण्याचें कारण म्हणजे ग्रीसमध्यें पुष्कळ ठिकाणीं धुळीचा मनस्वी त्रास

होतो. धूळ नाकातोंडांत जाऊन क्षय होऊन मरणाऱ्यांची संख्या येथें वरीच असते असें म्हणतात. ग्रीक लोकांच्या घरांचा आणखी विशेष हा कीं. बहुतेक घरें शक्य तो एकाच आकाराची व विस्ताराची असतात. ग्रीक शिल्पकलेचा हा एक विशेष आहे.बहुतेक घरें पांढऱ्या रंगाची असतात.

खेडेगांवांतील घरें लहान असून एक मजली असतात. घराच्या एका टोंकाला लहानशा टॉवरच्या आकाराचें एक धुराडें काढलेलें असतें. या छपरावर बगळे आपलीं घरटीं बांधून राहतात. रस्त्यांतून अतिशय धुळ असतें. शेतकरी लोकांचीं घरें बहुतेक शेतावरच असतात.

इंग्लंड:

आपल्या हिंदुस्तान देशाच्या पश्चिमेस फार दूर युरोप नांवाचा एक खंड आहे. त्या खंडाच्या एका कोपऱ्यांत इंग्लंड म्हणून एक लहानसा देश आहे. येथील खेड्यांतील घरें दगडविटांचीं बांधलेलीं असून छपरावर फरशा घातलेल्या असतात. छपरावर मोठीं धुराडीं असतात. या देशांत थंडी वर्फ, पाऊस, वारा यांचा फार त्रास होतो. त्यामुळें घरें फारच मजबूत बांधावी लागतात. शिवाय हिंवाळ्यांत ऊब रहावी म्हणून खोल्यांतून एक एक चुलाण किंवा भट्टी बांधावी लागते. घरांत भरपूर उजेड यावा म्हणून घराच्या खोल्यांना मोठमोठ्या खिडक्या ठेवलेल्या असून त्यांना कांचेचीं तावदानें लावलेलीं असतात, त्याच्या आंतून रंगी बेरंगी पडदे सोडलेले असतात. घरांसभोंवतीं लहानशीच बाग असून त्यांत विविध रंगांचीं फुलझाडें लावलेलीं असतात. घराच्या मागच्या बाजूला कांहीं फळझाडेंही लावलेलीं असतात.

नॉर्वे:

इंग्लंड देशाच्या उत्तरेला नॉर्वे या नांवाचा देश आहे. हा देश डोंगराळ आहे. शेत डोंगरावर

असल्यानें शेतकरी तेथेंच लांकडांचीं घरें बांधतात. घरांत उठावसायला, स्वयंपाकाला, दाणावैरण सांठवायला अशा निरनिराळ्या जागा असून त्या आपण बांधतो त्याप्रमाणें एकमेकांना लागून बांधलेल्या नसतात, तर अगदीं स्वतंत्र असतात. घरांशेजारींच गुरांचा गोठा व घोड्यांचा तबेला असतो. या घराभोंवतीं पाईन झाडांचीं दाट जंगलें आहेत. त्यामुळें घरें बांधण्याच्या कामीं त्याचा फार उपयोग होतो. खिडक्या, दारें, कपाटें वगैरेंच्या चौकटी, तुळया, खांब, तक्ते वगैरे सर्वच गोष्टी याच्या चांगल्या होतात. याच झाडापासुन तयार झालेला कागद व आगपेट्या परमुलखीं रवाना होतात.

## हॉलंड:

हा देश फ्रान्स देशाशेजारींच जरा उत्तरेस आहे. सबंध युरोप खंडांत हॉलंडचे डच लोक अतिशय स्वच्छ म्हणून नांवाजलेले आहेत. घरांत शिरतांना इंग्रजी पद्धतीप्रमाणें आपले जोडे घालून ते लोक आंत जात नाहींत. जोडे बाहेर रांगेनें लावून ठेवून नंतर ते घरांत शिरतात. एक तर बाहेर रस्त्यावर वरीच धूळ व चिखल असतो. आणि दुसरें असें कीं, घरही अतिशय स्वच्छ असते. सर्व भिंतींना बाहेरून निळा रंग दिलेला असून खिडक्या मात्र पांढऱ्याच ठेवतात. कठडे हिरव्या रंगाचे असतात. येथील सर्वच घरें अगदीं स्वच्छ, झकपक, व निटनेटकीं असतात. आंतून भिंतीच्या निम्म्या भागावर मंगलोरी कौलासारख्या कौलांचे तुकडे बसविले असून त्यांना निळा रंग दिलेला असतो. आणि वरच्या अर्ध्या भागाला नुसता चुनाच दिलेला असतो. जमिनीही कौलाच्याच केलेल्या असून मधल्या फटी बारीक वाळूनें भरून काढलेल्या असतात. एकंदर घर जसें कांहीं नुकतेच बांधलें

आहे असें दिसतें. परंतु वास्तविक तें कांरें नसून तें घर व त्यांतील सर्व सामानसुमान-भांडींकुंडीं-सुद्धां तेथील स्त्रिया रोजच्या रोज घासूनपुसून स्वच्छ करून ठेवतात.

## रशियाः

रशिया हा देश आशिया व युरोप या दोन्ही खंडांत उत्तरेस पसरला आहे. हिंवाळ्यांत येथें अतिशय थंडी पडून घरें, दारें, जमीन, झाडें वगैरे सर्वांवर बर्फाचे अगदीं दाट थर बसतात. अगोदर कडक थंडी व त्यांत झोंबणाऱ्या वाऱ्याची भर! रशियाचे उत्तरेस मोठा समुद्र असून तो नेहमीं गोठलेला असतो. या समुद्रावरून थंड वारे वाहण्याला सुरवात झाली म्हणजे मध्यंतरी त्यांना आडवायला कोठेंही फारसे डोंगर नसल्यामुळें ते थेट दक्षिणेकडे आरपार येतात. त्यामुळें सर्वच देश येथून तेथून थंडीमय होतो. येथील घरें लाकडांचीच बांधलेलीं असून ती साधारणतः ५-७ वर्षांपेक्षां जास्त काल टिकत नाहींत. कारण कितीतरी घरें या कालांत आंतल्या शेगडींतील विस्तवानें पेटून जळून जातात. घराच्या एका कोपऱ्यांत एक मोठी विटांची शेगडी बांधलेली असून तिच्यांतील विस्तव सारखा पेटलेला असतो. शेगडीवर एक मोठा लांकडी माचा मांडलेला असतो. त्यांवर तेथील माणसें एकमेकांना गुरफटून निजतात. खालून शेगडीचा शेक व वरून पांघरुणांची व एकमेकांच्या उबी यामुळें थंडी थोडी कमी भासते. शेगडीवर एक किटली सारखी ठेवलेली असते. या लोकांना चहाचा फार शोक आहे. उंच पेल्यांतून गरम गरम चहा पिणें त्यांना भारी आवडते.

लाप्लंड:



नॉर्वेच्या उत्तरेस लाप्लंड म्हणून एक अत्यंत थंड देश आहे. येथील लोकांना पोटापाण्याकरितां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं असें सारखें हिंडावें लागतें. त्यामुळें एकाच ठिकाणीं कायमचें घर बांधतां येत नाहीं. रेनडियर सांबराबरोबर हे लोक हिंडतात. हे लोक रेनडियरचें दुध काढतात, त्याचें मांस खातात व त्याची कातडी पांघरतात. प्रत्येक ठिकाणीं ते तंबू बरोबर नेतात. हा तंबू रेनडियरच्या कातड्याचा व लोंकरीच्या कापडाचा बनवितात. जागा पाहून तंबू ठोकला म्हणजे मध्यभागीं एक चूल मांडतात. ह्या चुलीवर अन्न शिजविण्याकरितां एक लोखंडी भांडें तंबूच्या आढ्यापासून लटकावून देतात.

## आस्ट्रेलिया

आस्ट्रेलिया हा खंड दक्षिण गोलार्धांत असल्यानें तेथें उत्तर गोलार्धापेक्षां वेगळी स्थिती


पाहावयास मिळतें. जून, जुलै, ऑगस्ट हे त्यांचे हिंवाळ्याचे दिवस. झाडांचा रंग हिरव्याऐवजीं निळा असतो. त्यांचीं पानें कधींच गळून पडत नाहीं. घरामध्येंही असाच फरक आहे.

इंग्लंडपेक्षां येथील हवा बरीच उष्ण आहे. अर्थात घराच्या पुढें ऐसपैस आंगण व गच्ची या ठिकाणीं पहावयास मिळते. या उघड्या जागीं उन्हाळ्यांत तेथील लोक आराम करतात. येथील घरें बहुधा एकमजली असतात. या ठिकाणीं गोरे वसाहतवाले राहतात.

पण या ठिकाणच्या मूळच्या काळ्या रहिवाशांचीं घरें अगदींच वेगळीं आहेत. हे मूळचे अडाणी लोक आतां पुष्कळच कमी कमी होत आहेत. यांचीं घरें रानटी अवस्थेंतील भासतात. त्यांना ‘ घर ’ कसें म्हणायचें हीच पंचाईत !

झाडाच्या फांद्या, सालीं यांच्या साहाय्यानें चारदोन रानटी माणसें एका तासाच्या अवधींत आपलें घर बांधू शकतात. फिरतां फिरतां नदीकांठीं चांगली जागा सांपडली किंवा अरण्यांत एखादी जागा गवसली कीं तेथें ते वास्तव्य करतात. लांब लांब बांबूच्या काठ्या जमिनींत रोवून नंतर त्यांची वरचीं टोकें एकत्र बांधलीं कीं घराचे अर्धें काम पुरें झालें. त्यानंतर गवत, माती इत्यादिंनी त्याच्या भिंती उभारण्यांत येतात. मुकाम असेल तोपर्यंत या घरांचा वापर होतो. मुकाम हलला कीं दुसऱ्या मुक्कामीं पुनः नवीन घर.

आस्ट्रेलियांतील पसरलेल्या अफाट अरण्यास “ बुश ” असें नांव आहे. या बुशमध्यें कांहीं गोरे लोक राहतात. ते सोनें शोधून काढतात. कांहींजण गुरें अगर मेंढ्या पाळतात. यांचीं घरें पूर्णपणें लांकडी फळ्यांची असतात. त्यास ‘ केबिन ’ असें नांव आहे.



न्यूझीलंड येथील मुळच्या रहिवाश्यांना 'मेअरिन' म्हणतात. त्यांच्या झोंपड्या बऱ्याच व्यवस्थित व कलापूर्ण असतात. किनी बेटांतील लोकांचीं घरें गवताचीं असून त्यांचीं छपरें उंच व उतरती असतात.

# अमेरिका

अमेरिकेंत रेड इंडियन्स ही एक सर्वांत जुनी अशी जमात आहे. त्यांच्यापैकीं अनेकजण अद्यापि आपल्या जुन्या परंपरेप्रमाणें राहतात आणि घरें बांधतात. त्यांच्या घरांना 'विगवॅम' असें म्हणतात. काठ्यांच्या साहाय्यानें गोल बांबू उभारून बाहेरच्या बाजूस मारलेल्या जनावरांची कातडी लावतात. टोळयाच्या नायकाचा तंबू कव्हां कव्हां एवढा मोठा असतो कीं आंतमध्यें चाळीस पन्नास माणसें एकावेळीं सहज बसूं शकतात.


हीं घरें लांबून फार चांगलीं दिसतात. पण जवळ जाऊन पाहतांच तितकीच गलिच्छ दिसतात. तंबूच्या बाहेर सारा केरकचरा व घाण टाकली जाते. आणि त्या घाणीवर मोठमोठीं क्रूर कुत्रीं वेळीं अवेळीं झडप घालीत सर्रास हिंडत असतात.



विगवॅम

कांहीं इंडियन झोंपड्या वांबू व गवत यांच्या पासून तयार केलेल्या असतात. लांवून हीं घरें वारुळासारखीं किंवा मधमाश्यांच्या घराप्रमाणें दिसतात. या घरांना वरच्या वाजूस फक्त एक झरोका असतो. त्यांतून धूर वाहेर जातो. आणि एक दार फक्त असते. येथें तुम्हाला कसलेही लांकडी सामान दिसणार नाहीं. मुलें उघड्यावरच खेळतात. हिंवाळ्यांत मोठ्या माणसांप्रमाणें लहानांनाही थंडीवाऱ्यापासून होणारा त्रास सोसावा लागतो.

युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका हा एक मोठा देश आहे. येथें न्यूयॉर्क म्हणून एक शहर आहे. सबंध पृथ्वीवर लंडन वगळल्यास, इतकें मोठें शहर सांपडणार नाहीं. येथील रस्त्यावर अफाट रहदारी एकसारखी असते. येथल्या इमारती इतक्या उंच आहेत कीं वोलायची सोय नाहीं ! या इमारतींचीं शिखरें इतकीं उंच असतात कीं,



त्याच इमारतीजवळ रस्त्यावर उभे राहून मान कितीही वर केली तरी तीं दिसत नाहींत. वरच्या मजल्यावरून खालीं रस्त्यावर पाहिलें तर माणसेंच काय पण वाहनें सुद्धां इतकीं लहान दिसतात कीं, जणूं मुंग्या !

आपण मुंबईच्या चारपांच मजली इमारती पाहिल्या कीं आश्चर्य व्यक्त करतो. मग युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका येथील सर्रास उंचच्या उंच इमारती पाहून आपणांस काय वाटेल ? एक मजला १४-१५ फूट उंच धरला तर चाळीस पन्नास मजली इमारतीची उंची किती होईल ? अशा इमारतीचा पाया फार खोल म्हणजे १००।१२५ फूट खोल खणावा लागतो. तुळया, खांब वगैरे-करितां लोखंडी गर्डर्स आणि पोलादी कांबी यांचाच उपयोग करावा लागतो. उंच घर बांधायचें म्हणजे भला मोठा पोलादी सांगाडाच उभा करावा लागतो. अशा एकाद्या घराचें बांधकामास सुरवात झाली म्हणजे केवढा तरी प्रचंड खणखणाट होत असेल ! ह्या एवढ्याला इमारतींतून कितीतरी कारखाने, किती तरी दुकानें, किती तरी कचेऱ्या, किती तरी बिऱ्हाडें-अर्थात किती तरी माणसें राहात असतात ! एक इमारत म्हणजे एक शहर झालें म्हणायचें ! ज्याप्रमाणें एकाद्या नगरपालिकेला रहिवाश्यांच्या सर्व सोयी पहाव्या लागतातः त्याचप्रमाणें या उंच इमारतींच्या माल-

काला दिवा-बत्ती, पाणी, विजेचे पाळणे, दुकानें, शिंपी, न्हावी, धोबी, पोष्ट व तार ऑफीसें शिवाय दवाखाने, वाचनालयें, हॉटेलें या सर्व सोयी कराव्या लागतात. अशा इमारतींचा तळमजला म्हणजे एक प्रकारचा कारखानाच होय.

अमेरिकन लोक एवढालीं उंच घरें बांधण्याचा एवढा खटाटोप कशाकरितां करतात बरें! याचें उत्तर असें आहे कीं, न्यूयॉर्क शहराची वस्ती एकसारखी वाढत आहे. नवीन घरें बांधण्यास जागा नाहीं, याकरितां असलेल्या जागेंतच मजल्यावर मजले चढविण्याचें काम न्यूयॉर्क येथील लोकांनीं एकसारखें चालविलें आहे.

येथील 'लार्विंज' नांवाचा मनोरा जगामध्यें सर्वांत उंच समजला जातो. त्याला ११० मजले असून रस्त्यापासून त्याची उंची १२०८ फूट आहे. वर जाण्याकरितां कमीजास्त गतीचे तीन पाळणे आहेत. सबंध उंची चढून जाण्याला एका वेगवान पाळण्याला तीन मिनिटें लागतात.

### ग्रीनलँडः

येथील लोकांना 'एस्किमो' म्हणतात. येथें अतिशय बर्फ पडत असल्यामुळें बाराही महिने एकाच प्रकारच्या घरांत राहतां येत नाहीं. हवेप्रमाणें त्यांचें घरही बदलते.

ग्रीनलँडमधील एस्किमो बर्फाच्या घरामध्यें राहतात. बर्फाचें घर म्हणतांच आपल्या अंगावर कांटा येतो. आणि हीं माणसें त्या बर्फाच्या घरांत कशीं राहात असतील अशी शंका येतें. जसें एस्किमोचें अन्न आपल्या अन्नाहून वेगळें तसेंच त्यांचें घरही अगदीं वेगळ्या प्रकारचें असतें.

बर्फाचीं घरें मोठी उबदार असतात. जमीन खणून एका खोलीएवढा एक खड्डा तयार करतात. हाडाच्या अगर लोखंडाच्या चाकूनें बर्फ कापून



ते त्याच्या विटा तयार करतात. या विटा एकावर एक ठेवून डेरेदार सोगंटीप्रमाणें घर करतात. मग एका बाजूस अगदीं अरुंद दीड फूट उंच असे बोगद्यासारखें दार करतात. त्यांतून सरपटतच आंत जावे लागते. बाहेरील थंडगार हवा अगर अस्वलें आंत शिरूं नयेत म्हणून अशी गिड्डी दारें ठेवावी लागतात. या घरास खिडक्या मुळींच नसतात. फक्त हवा येण्यासाठीं वरच्या बाजूस मध्यभागीं एक भोंक ठेवलेलें असतें. आंत धड उभेंही राहतां येत नाहीं. जमीनीवर सील माशाची कातडीं पसरलेली असतात. बाजूला बर्फाचाच बाक बसावयास केलेला असतो आणि त्यावरही हेंच कांतडें पसरलेलें असते. दगडाच्या पणतींत सील माशाचेंच तेल घालून शेवाळयाची वात करून दिवा लावून ठेवलेला असतो. या दिव्याचा प्रकाश अंधुकच असतो, पण उष्णता इतकी प्रखर

असते कीं थंडीच्या दिवसांत व बर्फाच्या घरांत लोक कपडे काढून निजतात. हा दिवा हीच त्यांची शेगडी ! यामुळें चिकट काजळींचीं पुटेंच्या पुटें एस्किमोच्या अंगावर चढलेली असतात. म्हणून ते लोक मूळचे पिवळसर वर्णाचे असले तरी काळसर दिसतात. शिवाय ते स्नानही कधींच करीत नाहींत. पाणीच नाहीं तर स्नान तरी कशानें करणार ? यांच्या घरास 'इगलू' म्हणतात. चार दोन माणसें हें घर फार थोड्या अवधींत बांधू शकतात.

उन्हाळ्यांत एस्किमो बर्फाच्या घरांतून राहत नाहींत. कारण उष्णतेनें बर्फ वितळू लागतो. उन्हाळ्यांत समुद्रांतून वाहत आलेल्या कांहीं काठ्या मिळाल्या तर ठीकच नाहींतर व्हेल माशांचीं हाडें तो जमीनींत पुरतो व त्यावर कातडीं पसरतो. वाऱ्यानें उडून जाऊं नयेत म्हणून सभोंवतीं कात-




ड्यावर दगड ठेवतो. दारही सीलच्या कातड्याचेच. या घराचे पुनः कातड्याच्या पडद्यांनीं भाग करतात. आणि मग स्वयंपाकघर व दिवाणखाना तयार होतो. एस्किमो लोक मोठे आनंदी व हंसतमुखी असतात. आगतस्वागत ते उत्तम तऱ्हेनें करतात.

## उंचावरचीं घरें

आजच्या विसाव्या शतकांत देखील कांहीं ठिकाणीं रानटी अवस्थेंत असलेले लोक झाडावर घरें बांधतात. हीं घरें फार उंचीवर असतात. लांबून पहाणाराला तीं पक्ष्यांचीं घरटींच वाटतात.

या रानटी लोकांतील लहानलहान टोळ्यांची नेहमींच भांडणें होत असतात. आपल्या शत्रू-पक्षाकडून आपणांस व आपल्या बायकापोरांना त्रास पोहोचूं नये म्हणून ते लोक आपलीं घरें जितकीं जास्त उंच जागेवर बांधतां येतील तितक्या उंचीवर ते बांधतात. या उंच घरांत चढतांना ते शिड्यांचा उपयोग करतात. रात्रीं या शिड्या वर ओढून घेतल्या जातात. कांहीं रानटी जमातींत एक विचित्रच पद्धत आहे. अशा उंच जागीं बांधलेल्या घरांत कित्येकदां तरुण उपवर मुलीस एकटीच ठेवतात. ज्या तरुणास तिच्याशीं लग्न करणें असेल त्यास त्या उंच जागेवर जाण्याचा प्रयत्न करावा लागतो. त्या मुलीची त्या तरुणाबरोबर लग्न करण्याची इच्छा नसल्यास ती शिडी वर उचलून मार्ग बंद केला जातो. अगर यदाकदाचित तो अनपेक्षितपणें वर आलाच तर ती त्याचेवर दगडांचा मारा करूं शकते किंवा भांडून आपली नापसंती दर्शवूं शकते.

मध्य आफ्रिकेंमध्यें कित्येक ठिकाणीं अशा



झाडावरतीं घरें क्रूर जनावरांपासून रक्षण व्हावें म्हणूनही बांधलीं जातात. कांहीं भागांत झाडांचा उपयोग न करतां लाकडांचा उपयोग करतात. जमिनीपासून १०-१२ फुटाच्या उंचीवर हीं घरें लाकडी तुळयांच्या साहाय्यानें उभीं करण्यांत येतात. या घरांचीं छपरें एखाद्या नरसाळ्या-प्रमाणें असून तीं गवताचीं बनविलेलीं असतात. या छपरांचीं उंचीं कित्येकदां आठशें फुटापेक्षांही जास्त असते.

## फिरस्त्यांचीं फिरतीं घरें

आपलीं घरें किती चांगलीं असोत, तीं फिरतीं असतील तर अधिक बरें असें कित्येकांना वाटते. अशा फिरत्या घरांत रहावयाचें आणि रोज नवी नवी हवा अनुभवायची अशी या लोकांना खोडच लागलेली असते.

अशा फिरस्त्यांत 'जिप्सी' लोक अग्रगण्य होत. स्वातंत्र्य, प्रेम व भटकण्याची आवड हा

त्यांचा स्वभाव विशेष होय. एका मोठ्या लांकडी गाड्याला घोडा जुंपुन हा गाडा ते मनमानेल तिकडे नेतात आणि मुक्काम ठोकतात. कित्येक मोठमोठ्या 'मोटरव्हॅन' वापरतात. या घोडा-गाड्या किंवा व्हॅन्स म्हणजे छोटीं हालतीं चालतीं घरेंच होत. मन चाहेल अशा रम्य निसर्ग ठिकाणीं थांबायचे आणि उघड्यावर यथेच्छ दिवस काढायचे हाच यांचा शिरस्ता.

हॉलंडमध्यें रस्त्याऐवजीं कालवे असल्यानें या कालव्यावर बोटी असतात. या बोटीवर कित्येक लोक राहतात. स्वयंपाक बोटीवर, खेळ बोटीवर सर्व कांहीं बोटीवर! या बोटींना 'डच बार्ज' असें म्हणतात.

आशिया आणि आफ्रिका खंडांतील वालुकामय प्रदेशांत अरब लोक हे फिरस्ते आहेत. तंबू, उंट, बकरी, मेंढ्या इत्यादि सारा जामानिमा घेऊन हे अरब एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातात. या प्रवासांत ते कांहीं जिन्नसा खरेदी करतात. आणि कांहीं जिन्नसांची विक्री करतात. वाटेंत अनेकवेळां पाण्याच्या अभावी फार हाल होतात.



प्रवासावर उंटाच्या तांडाच्या तांडा निघतो. उंटांच्या पाठीवर भली मोठीं ओझीं लादलेलीं

असतात. कांहीं उंटाच्या पाठीवर पडद्याआड स्त्रियाही असतात. पुरुष पायीं अगर घोड्याच्या पाठीवर असतात. अंधार पडला कीं हे अरब प्रवासी जलाशयाचे कांठीं मुक्काम करतात.यावेळीं ते वसके तंबू ठोकतात.

सैबेरियांतील लोकही भारी भटके! बरोबर थोडी गुरें अगर रेनडियर घेऊन हीं माणसें बाहेर पडतात. वर्षांतील ६।७ महिने भटकल्यावर हिंवाळ्यांत डोंगराच्या पायथ्याशीं मुक्काम ठोकतात. या मुक्कामांत त्यांना तंबूचा उपयोग होतो.

## फिरतीं घरें

आपलें घर कितीही चांगलें व हवेशीर असलें तरी तें सोडून कांहीं काल दुसरीकडे जावे अशी इच्छा होतेच. दुसरीकडे गेल्यानें आपल्या घराची आठवण एकसारखी होत राहतेच. ही अडचण दूर व्हावी म्हणून फिरतीं घरें अलिकडे परदेशांतील लोक बांधूं लागले आहेत. हातगाडी घेऊन जसें आपण कुठेंही जाऊं शकतो; तसेंच या घरांच्या खालीं चाकें असल्यामुळें आपलीं



घरें घेऊन इच्छित ठिकाणीं ते सहज जाऊं शकतात.

पण अशीं घरें सर्वास इतरत्र झालीं नाहींत: तोंपर्यंत तूर्त प्रचलित फिरतीं घरें कोणतीं आहेत त्यांची माहिती मिळवूं.

मोटार कॅरवॉन व कॅरवॉन म्हणजे चालतीं फिरतीं घरेंच होत. मोठी घोडागाडी अगर मोटारगाडी यामध्यें एका खोलीसारखी व्यवस्था केलेली असते. त्यांत मोजकें सामान बसविलेलें असतें. बऱ्याच लोकांना शहरीं जीवनाचा पुष्कळ कंटाळा येतो. असे लोक नित्यनियमानें सुट्टीच्या दिवशीं या गाड्यांतून निसर्ग रमणीय ठिकाणीं जातात. तेथें अल्पोपहार उरकतात; थोडावेळ मजेंत घालवितात. आणि मग सूर्यास्त होतांच परततात. आपल्याकडे लोक भटक्यावृत्तीला



नांवें ठेवतात. परदेशांत ही भटकीवृत्ति चांगली समजतात. त्यायोगानें आठवड्यांतील कामानें आलेला कंटाळा पार निघून जातो. उत्साह वाढतो आणि प्रकृति निकोप राहाते. निसर्ग-शोभा न्याहाळतां येते हें निराळेंच !

परंतु या शिवाय कांहीं लोकांना भौगोलिक परिस्थितीमुळें आपलीं घरें फिरतीं करावीं लागतात. हॉलंडमध्यें पाण्याचे रस्ते आहेत. त्यामुळें त्या लोकांना बोटींतूनच इकडे तिकडे फिरावें लागतें. घराबाहेर पडायचें म्हणजे लहान लहान पडावांचा उपयोग त्यांना करावा लागतो. कित्येकांना कामानिमित्तानें एकसारखे पाण्यावरच राहावे लागतें. असे लोक या नावांतच एक छप्परदार लाकडी खोली बांधतात. त्या खोलींत त्यांचीं मुलें राहतात व खेळतात.



आशियांतील अरब लोकांना वाळवंटांतून प्रवास करावा लागतो हा प्रवास फार लांबचा असल्यानें अधूनमधून त्यांना मुक्काम करावा लागतो. उंटाच्या पाठीवरील गाठोडे सोडून ते थोड्याच वेळांत तंबू उभारूं शकतात. हा तंबू बराचसा बसका व पसरट असतो. त्यातली



वाऱ्यानें उडून जाऊं नये म्हणून त्यांची उंची फार ठेवीत नाहींत.

सैबेरियांतील लोकही भारी भटके आहेत. ते सारखे भटकतात. मग थंडीच्या दिवसांत एकाद्या डोंगराच्या पायथ्याशीं ओळीनें तंबू उभारून मुक्काम करतात. त्यांच्या बरोबर गुरें, घोडी, रेनडियर इत्यादि जनावरेंही असतात.

## शहरांचा उदय :

मनुष्य हा एकलकोंडा प्राणी नाहीं, तो गटागटानें राहातो. या गटास आपण समाज म्हणतो. पुरातन काळापासून देखील माणसें कधीं एकटीं राहिल्याचें ऐकिवांत नाहीं. फार फार वर्षांपूर्वीं माणसें कळपाकळपानें हिंडत. प्रथम ते शिकारी होते. जेथें जेथें शिकार मिळे तेथें तेथें ते जात. एका ठिकाणीं शिकार मिळाली नाहीं कीं ते पुढें सरकत. शिकारीवृत्तीनंतर ते गुराखी बनले. गुरांना जेथें भरपुर गवतचारा मिळे, तेथें कांहीं काल मुक्काम करीत. चारा संपला कीं त्यांचा तळ हाले. या पूर्वीच्या शिकाऱ्यांना किंवा गुराख्यांना घरांची आवश्यकता वाटत

नसे. आणि एका ठिकाणीं फार काल न राहि- ल्यानें खेडीं किंवा शहरें हीं वसली गेलीं नाहींत.

हा काल निघून गेल्यावर माणसें शेतीं करूं लागलीं. एकाच ठिकाणीं राहून ते आपल्या शेताची मशागत करूं लागले. वर्षानुवर्षे शेतां- तून त्यांना पोटास पुरेल असें धान्य मिळूं लागले. तेव्हां भटकण्याचें कांहीं कारणच उरलें नाहीं. त्या शेताजवळच ते कायमचे राहूं लागले. त्या घराबद्दल त्यांना पुढें पुढें आस्था वाटूं लागली. शेतांशेतांतून झोपड्या तयार होऊं लागल्या. अशा जवळजवळ बांधल्या गेलेल्या झोपड्यांना ' खेडें ' असें नांव पडलें. ज्या खेड्यांना आपला पसारा वाढण्यास वाव नाहीं, खुद्द खेड्यांत कामाधंद्यानें वाढ झाली नाहीं तीं खेडींच राहिलीं.

पण बरीच खेडीं पुढें पुढें झोपड्यांच्या संख्येत वाढ झाल्यानें मोठमोठीं बनलीं. खेड्यांचा पसारा वाढल्यानें त्या खेड्यांची मर्यादा दुसऱ्या खेड्यांना जाऊन भिडली. चारपांच खेडीं हारो- हार लागून त्यांचा एक मोठा गट झाला. त्यास आपण ' शहर ' म्हणूं लागलों.

प्राचीन कालांत रोमन व ग्रीक लोकांनीं फार सुंदर शहरें बांधलीं होतीं. भक्कम, मजबूत व कलापूर्ण अशा त्या शहरांतील इमारती होत्या. अजूनही त्यांचे अवशेष इजिप्त, ग्रीस, मेसोपोटे- मिया या ठिकाणीं पहावयास मिळतात.

हीं शहरें वाटेल त्या ठिकाणीं वसलेलीं नाहींत असें आपणास नकाशावरून दिसून येईल. माण- सांना पाण्याची प्रथम जरूरी आहे. हें पाणी जेथें मुबलक मिळेल तेथें ते राहूं शकतात. अर्थात नदीच्या तीरावर शहरें वसलेलीं दिसतील. जी जमीन अधिक सुपीक तेथील शहरें शेतीमुळें प्रसिद्ध पावली.

यान्त्रिक सुधारणेमुळें कांहीं उद्योगधंद्यांची वाढ झाली. जेथें कोळसा सांपडेल, जेथें लोखंड सांपडेल तेथें माणसें जाऊं लागलीं. अडचणीचीं ठिकाणें असलीं तरी केवळ उद्योगासाठीं ते तेथें राहूं लागले. कांहीं शहरें धंद्यामुळें पुढें आलीं. आपल्याकडील जमशेटपूर, अहमदाबाद हीं अशीं शहरें होत. कामाधंद्याच्या निमित्तानें माणसें शहरोशहरीं जाऊं-येऊं लागलीं. वाहनांची सोय व सुधारणा झाल्यानें प्रशस्त रस्ते बांधले जाऊं लागले. तयार झालेल्या जिनसा, धान्य, कच्चा माल एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविण्यास सुरवात झाली. समुद्र किनाऱ्यावरील बंदरांना त्यामुळें महत्त्व आलें. ज्या देशांत अशीं सुखसोयींनीं सज्ज असलेलीं बंदरें जास्त- त्यांचा व्यापार वाढला. त्या देशाची सांपत्तिक स्थिति झपाट्यानें सुधारूं लागली.

शहराच्या वाढीस अशीं अनेक कारणें असूं असतील. आपल्याकडील पुणें, बनारस, महाबळेश्वर इत्यादि शहरांच्या वाढीचीं कारणें तुम्हांस सहज उमजतील.

या शहरांचीं व्यवस्था तेथील लोकांनीं निवडून दिलेले प्रतिनिधी पाहतात. नवीन घरें बांधण्यापूर्वीं ती जागा बारकाईनें पाहणें, घराचा नकाशा पाहणें व तो पसंत करणें, आरोग्यवर्धक अशीं घरें बांधूं देणें, जुनीं पडीक घरें पाडणें, धोक्याचीं घर जमीनदोस्त करणें, शहराचें आरोग्य व सौंदर्य वाढेल असे रस्ते तयार करणें, हवेशीर जागा वाढत्या लोकसंख्येसाठीं राखून ठेवणें, व तेथें पुढें घसाहत करण्यास परवानगी देणें, त्या जागेवर अगोदरच रस्ते पाडून प्लॉट्स्

पाडणं, या साऱ्या गोष्टी या प्रतिनिधींना पहाव्या लागतात.

अशा रीतीनें आपण हा घरांचा इतिहास पाहिला. पुरातन कालांतील रानटी माणसाचें आपल्या गुहेवर प्रेम होतें कीं नाहीं हें आज सांगतां यावयाचें नाहीं. पण आजच्या विसाव्या शतकांतील सुधारलेल्या माणसाचें मात्र त्यांच्या घरावर पूर्ण प्रेम आहे. त्या घराबद्दल त्यास योग्य अभिमान आहे आणि म्हणूनच तो ज्या घरांत राहातो, ज्या गांवांत राहातो तें घर तो गांव त्यांचें आरोग्य व सौंदर्य त्यानें कधींही बिघडूं देतां उपयोगी नाहीं. जें कांहीं करावयाचें तें सारें त्या घरासाठीं आणि गांवासाठीं!– जगायचे तें त्या घरासाठीं आणि गांवासाठीं !!

— आणि मरायचे तें देखील त्या घरासाठीं आणि गांवासाठीं !!!

आणखी कांहीं नमुने :




आफ्रिका खंडाचे मध्य भागांत एक मोठें जंगल आहे. या जंगलांत पिग्मी जातीचे जंगली लोक राहातात. येथील झाडी इतकी घनदाट आहे कीं तिच्यामधून सूर्याचे किरण खालीं जमिनीपर्यंत पोंहोंचणें शक्यच नसते.

पिग्मी लोकांचें घर काटक्यांचें व पानांचें केलेलें असतें. आपण ज्याप्रमाणें धान्य ठेवण्याची कणगी विणतो त्याच पद्धतीनें हें घर बांधलेलें असते. फांद्यांचीं टोंकें वर वळवून घेतल्यावर मधल्या भोंकांतून पावसाचें पाणी खालीं गळूं नये म्हणून विशेष खबरदारी घ्यावी लागते. या घराचा आकार एस्किमोच्या घरासारखा वाटोळा असतो. या घरांतही एस्किमोच्या घराप्रमाणेंच ओणव्यानें शिरावें लागतें. कारण त्याचा दरवाजाच तितका लहान असतो. हें घर डाहाळ्यांचें व चालचलाऊ केलेलें असल्यामुळें जास्त काळ टिकणें शक्य नसते. तें दहा-पंधरा दिवस टिकलें तरी बस्स !




दक्षिण अमेरिकेंत अमेझोन या नांवाची एक मोठी नदी आहे. या नदीच्या दोन्ही बाजूंस किर्र झाडींचें दाट जंगल पसरलेलें आहे. अशा दाट



जंगलांत माणसं रहात नसतील असें तुम्हांस वाटेल. पण तसें मात्र नाहीं हो! या भयंकर अरण्यांतही कोठें कोठें मनुष्यवस्ती सांपडतेच. यांचीं घरें म्हणजे काटक्या व पाला पाचोळा यांचीं खोपटें व झोपड्या होत. कांहींजण थंडी वाऱ्यापासून बचाव करण्यासाठीं कुडासारखा आडोसा फक्त तयार करतात. त्यावर छप्परसुद्धां नसते. कित्येक नदीकांठीं लाकडें रोवून त्यांच्या माळ्यावर ते आपलीं घरें बांधतात.

### फिजी लोकांचीं घरें :

फिजी बेटांतील लोक गवताच्या सुंदर झोपड्या बांधतात. त्याचीं छप्परें फार उंच व एकदम उतरती असतात. हीं छप्परें कित्येकदां ४० फुटापेक्षांही उंच असतात.



## माणसानें केलेली सुधारणा :

ज्याप्रमाणें घरामध्यें उत्क्रांति झाली, त्याप्रमाणें विविध गोष्टींमध्यें उत्क्रांति झाली. अगदीं पूर्वी माणसाची स्थिति जनावरापेक्षां वेगळी होती अशां तला भाग नव्हता. पण माणसानें आपली उन्नति केली आणि त्यावरोबरच जगाचीही उन्नति केली. माणसाचें पूर्वजांना पूर्वी आसरा नव्हता कीं शक्ति नव्हती. बिचारे रानावनांत भटकत आणि मिळेल त्या कंदमुळावर दिवस काढीत. एखादें जनावर आलें कीं घाबरून ते सैरावैरा पळत. आज या स्थितीमध्यें केवढा जमीन अस्मानाचा फरक पडला आहे हें आपण पाहतो आहेच. हा फरक माणसानें आपल्या अक्कल हुषारीनें घडवून आणला.

माणसाला ज्या ज्या वस्तुची गरज लागते त्या त्या वस्तु त्यास जमीन, पाणी, हवा यापासू-

नत्र मिळतात. माणसानें जमीन, पाणी व हवा यांचा वेळोवेळीं उपयोग करून घेतला. यासच आपण सुधारणा म्हणतों. आपल्या पूर्वजांच्या जमीनीमध्यें बरीच संपत्ति होती. सभोंवती पाणी व हवा यांचा अवाढव्य पसारा होता. पण या गुप्त धनाची त्याला जाणीव नव्हती आणि बिचारा दोन्ही हातांनीं होईल तेवढें कष्ट करीत होता.

कणाकणानें माणसानें या गुप्त धनाची माहिती करून घेतली. हळुहळु त्यानें आपलें पाऊल पुढें टाकण्यास सुरवात केली आणि शेवटीं निसर्गावर मात केली.

हाताच्या मदतीला हत्यारें त्यानें घडविली. विस्तवाचा शोध लावला. जनावरांना माणसाळून त्यांचा उपयोग करून घेतला. जमीनीची मशागत करून धान्याची पिपज केली. पाणी आणि हवा यांना आपलें दास्यत्व पत्करावयास लावलें. त्यांच्याकडून तो मोठमोठाली अजस्त्र कामें करवून घेऊं लागला. जमीनींतून खनिज संपत्ति बाहेर काढली. वीज शोधून काढून तिला अनेक कामें करायला लावली.

हजारों वर्षे लोटलीं. माणसानें चौकसवृत्तीनें शोधकवृत्तीनें आपल्यावर येणारीं संकटें दूर केलीं नवनवीन अनुभव पैदा करून ज्ञान संपादन केलें. पूर्वीच्या ज्ञानांत भर टाकली. दगडी हत्यारापासून तो थेट अजस्त्र यंत्रापर्यंत त्यानें मजल गाठली लाकडी ओंडक्यापासून तो तहत अवाढव्य आगबोटीपर्यन्त तो येऊन पोहोंचला. पायीं भटकणारा आतां विविध वाहनांचा उपयोग करूं लागला. गुहेमध्यें राहणारा आतां नयनमनोहर बंगल्यांत राहूं लागला. एकाकीं राहणाऱ्या या माणसानें आतां केवढी अफाट शहरें वसविलीं आहेत.

अशा रीतीनें माणसानें आपली सुधारणा करून घेतली आहे.

यावरून काय सिद्ध होत आहे? माणसानें केवळ अन्नासाठीं, केवळ आसऱ्यासाठीं किंवा केवळ कपड्यालत्त्यासाठीं हें केलें नाहीं. मानवी जीवन सुखमय आणि उत्तम व्हावें म्हणूनच माणसानें आपल्या शोधकवृत्तीचा आणि उत्पादन शक्तीचा उपयोग करून रानटी जगाचें नंदनवनांत रूपांतर केलें. या हानींमुळें मानवी सुधारणा शक्य झाली आणि शेवटीं जग राहण्यास योग्य असें झालें.

अशा या सुधारलेल्या जगांत आपण जन्मास आलों आहोंत. आपल्या सुखासाठीं आपल्या अगोदर कितीतरी पिढ्यांनीं आयुष्यभर कष्ट केले असतील याची जाणीव आपणांस कृतज्ञतेनें व्हावयास पाहिजे. प्रत्येक पिढींत सुधारणेचें आणि प्रगतीचें एकएक पाऊल पुढें पुढें पडत असते. ज्यावेळीं आपण जन्मास येतो त्यावेळीं पूर्वीच्या पिढींची पुण्याई आपणांस अनायासे लाभत असते. कांहीं गोष्टींचा उपभोग आपणांस सहजगत्या घेतां येतो. यापैकीं कांहीं गोष्टी चांगल्या असतात, कांहीं गोष्टी तितक्याशा चांगल्या नसतात, कांहीं अर्धवट राहिलेल्या असतात. आज जे मोठे आहेत. ते मागील पिढीनें अर्धवट टाकलेलें काम हातीं घेऊन पूर्ण करण्यासाठीं खपत आहेत. लौकरच ते वृद्ध होतील आणि मागील पिढीप्रमाणें ते मृत्यू पावतील. मग आजच्या तरुण पिढीवर तेंच काम पुढें चालू ठेवण्याची जबाबदारी येऊन पडेल. आणि त्यांना तें काम तडीस न्यावें लागेल.

मग अशावेळीं बालकांनो तुम्हीं काय कराल?

जगांतील विविध प्रश्न कसे सोडवाल? जगांत जीं अनेक राष्ट्रें आहेत तीं युद्धास प्रवृत्त कशी होतील असा प्रयत्न तुम्ही कराल कां जगामध्यें नितांत शांतता लाभण्यासाठीं तुम्ही झटाल? मानवी स्मृतीचें लोण तुमच्यापर्यंत येऊन ठेपलें आहे. पूर्वजांनीं तुमच्यासाठीं जें करायचें तें केलें आहे. आतां तुमची पाळी आली आहे. तर मग घ्या महात्म्याचें नांव आणि लागा कामाला—

जय हिंद



# अवघ्या ५ रुपयांत

सर्वांग सुंदर पुस्तकें व वाचनीय मासिकें घरपोंच मागवा.

**भगिनी**

वार्षिक वर्गणी २ रुपये
किरकोळ अंकाची किंमत ४ आणे
दिवाळी अंकाची किंमत १ रुपया
वर्गणीदार कोणत्याही अंकापासून होतां येते.

**शिक्षक**

वार्षिक वर्गणी २ रुपये
किरकोळ अंकाची किंमत ३ आणे
वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होतां येते

**वत्सला प्रकाशन**

वार्षिक वर्गणी २ रुपये

मौलिक मजकूर, माफक किंमत आणि मोहक छपाई अशा वैशिष्ठ्यानें नटलेलीं पुस्तकें दरवर्षी प्रकाशित होत असतात. ग्राहकास त्या त्या वर्षांतील ३-३॥ रुपये किंमतीचीं ३-४ पुस्तकें वर्गणींत घरपोंच पाठविलीं जातात.

जगताप पब्लिशिंग हाउस पुणें २.

म. ग्रं. सं. ग्रंथालय
क्र. ९९३८७ का. क्र.
वि. ... आ. ... भा.

## प्राथमिक शाळेसाठीं

# मुद्दाम लिहिलेलीं उपयुक्त पुस्तकें

### आपलें जग

(जग आणि माणूस यांचा फार जुना इतिहास)
पृष्ठें ६४ : किंमत ५ आणे : चित्रें ५०
सरकारनें मंजूर केलेलें

### हस्तव्यवसाय

मराठी पहिलीसाठीं—किंमत ५ आणे
( सरकारनें मंजूर केलें आहे )
मराठी दुसरीसाठीं—किंमत ६ आणे
( मंजूरीस रवाना )

### शास्त्राची टिपणवही

मराठी सातवीसाठीं शास्त्र विषयासाठीं अनेक शाळांतून या टिपण वह्या मोठ्या प्रमाणावर वापरल्या जात आहे. आपणही एकवेळ मागवून पहा.
किंमत ८ आणे

**जगताप पब्लिशिंग हाउस**
१२४८ शुक्रवार पेठ, पुणें २.

IRBK-0111387

## आमचें बाल-वाङ्मय

| | | | |
|---|---|---|---|
| (१) व्हेनिस शहरचा व्यापारी | ०-८-० | (५) आजकालचीं वाहनें | ०-६-० |
| (२) जसें तुम्हांस आवडेल तसें | ०-६-० | (६) आपलें जग | ०-१०-० |
| (३) अथेल्लो | ०-६-० | (७) आपलें घर | ०-१०-० |
| (४) अँन्टनी आणि क्लिओपाट्रा | ०-६-० | (८) सोराब आणि रुस्तुम | ०-५-० |

वरील सर्व पुस्तकें अल्पमोली, आकर्षक व आल्हाददायक अशीं आहेत. आठ पुस्तकांचा गट एकदम घेणारास ट. ख. सह दोन रुपये आठ आणे पडतील. हीं सारीं पुस्तकें आबालवृद्ध स्त्री-पुरुष मोठ्या आवडीनें वाचतात. आपणहि हीं पुस्तकें मागवून मनमुराद आनंद लुटा.

★

जगताप पब्लिशिंग हाऊस, १२४८ शुक्रवार पेठ, पुणें २

किंमत १० आणे